




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १६१ * नांदेड * बुधवार, दि. १७ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# ‘ऑपरेशन टायगर’ ची नांदेडमध्ये लगबग; विमानतळावर आलेल्या ‘स्पेशल चार्टर’ची चर्चा

## ▸ नांदेडहून खासदार दिल्लीकडे रवाना
## ▸ ठाकरेंचे कोणकोणते खासदार फुटणार?



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सुरू करण्यात आलेल्या ‘ऑपरेशन टायगर’ची नांदेडमध्ये लगबग सुरू असल्याचे मंगळवारी दिसून आले. नांदेड विमानतळावर मंगळवारी सायंकाळी आलेल्या ‘स्पेशल चार्टर्ड फ्लाईट’ने अनेक खासदार नवी दिल्लीला रवाना झाल्याचे समजते.




मंगळवारी सायंकाळच्या सुमारास नांदेड विमानतळावर अचानकपणे एक स्पेशल चार्टर्ड फ्लाईट आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या ‘ऑपरेशन टायगर’च्या मोहिमेवर हे ‘स्पेशल चार्टर्ड’ नांदेडमध्ये आल्याचे सांगितले जात आहे. शिवसेना ठाकरे गटाचे सहा खासदार फुटणार असल्याची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू असून यात नांदेडच्या आसपासचे ही खासदार असल्याचे बोलले जात आहे.

शिवसेना ठाकरे गटातून फुटून हे खासदार स्वतंत्र गट स्थापन करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यासाठी बुधवारी दिल्लीत लोकसभा सभापतींची भेट घेऊन स्वतंत्र गट म्हणून मान्यता घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

### नांदेडच्या आसपासचे खासदार

ठाकरे गटातून फुटणाऱ्या खासदारांमध्ये नांदेडच्या आसपासचे खासदार असल्याचे बोलले जात असून नांदेड विमानतळावरून उड्डाण करणे त्यांना सोयीचे असल्याने नांदेड विमानतळावर त्यांना घेऊन जाण्यासाठी हे स्पेशल चार्टर आल्याचेही बोलले जात आहे. नांदेडच्या आसपास हिंगोली परभणी त्याचबरोबर यवतमाळ ही असल्याने ऑपरेशन टायगरच्या मोहिमेत नेमके कोणकोणते खासदार सहभागी झाले आहेत, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ठाकरेंच्या सहा खासदारांपाठोपाठ एकनाथ शिंदेही दिल्लीच्या दिशेने

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात ऑपरेशन टायगरला सुरुवात झाली असून ठाकरेंच्या शिवसेनेमध्ये पुन्हा एकदा फूट पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ठाकरेंचे नऊ पैकी सहा खासदार हे दिल्लीत दाखल झाले असून एकनाथ शिंदेंही रात्री दिल्लीला रवाना झाल्याचे समजते. दिल्लीत दाखल झालेले ठाकरेंचे खासदार हे बुधवारी सकाळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे.

एकीकडे ठाकरेंचे सहा खासदार दिल्लीत पोहोचले असून दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिल्लीच्या दिशेने रवाना झाले आहेत. ठाकरेंचे सहा खासदार हे शिंदेंच्या शिवसेनेत येण्यास तयार असून त्यांच्या सह्यांचे पत्रही तयार असल्याची माहिती आहे. त्यामुळे या सगळ्या खासदारांसोबत दिल्लीत बैठक घेऊन त्यांचा वेगळा गट निर्माण केला जाऊ शकतो का याची चाचपणी केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## खासदारांनी आई, साईबाबा तर कोणी मुलाची शपथ घेतली –संजय राऊत

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जन्मशताब्दी आहे. त्यांनी बहुतेक पक्षात खंजीर खुपसण्याचे सुरे तयार करून ठेवले असतील. दुसरं वेगळं ते काही करू शकत नाहीत. हे दिल्लीचे घरगडी झाले आहेत. जे खासदार त्या दिवशीच्या बैठकीत सहभागी झाले, त्यांनी आई भवानीची शपथ घेतली आहे, ‘साहेब, आम्ही तुमच्यासोबतच आहोत.’ कोणी मुलाची शपथ घेतली, कोणी आईची शपथ घेतली, कोणी तुळजाभवानीची शपथ घेतली, तर कोणी साईबाबांची शपथ घेतली. या शपथा त्यांनी स्वतः घेतलेल्या असल्यामुळे आणि ते हिंदुत्ववादी असल्याने ते हिंदुत्वाचे पालन करतील, असा दावा खा. संजय राऊत यांनी केला आहे.

## आता कौटुंबिक वाटणीची मोजणी फक्त २०० रुपयांत

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील सर्वसामान्य शेतकरी आणि जमीनधारकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक आणि निर्णय घेतला आहे. जमीन मोजणीच्या प्रक्रियेत होणारा उशीर आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी शासनाने मोजणीचे नवे दर आणि कडक नियम जारी केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता कुटुंबात झालेल्या जमिनीच्या वाटणीची मोजणी प्रति पोटहिस्सा अवघ्या २०० रुपयांत केली जाणार आहे.

## तुकाराम मुंढे नांदेडात दाखल झाल्याची अफवा; कारवाईच्या धास्तीने पानटपऱ्या बंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात भेसळखोरी, गुटखा व मुदतबाह्य औषध विक्री विरोधात कारवाईचे सत्र सुरु केले आहे. यातच आयुक्त तुकाराम मुंढे हे मंगळवारी नांदेडात दाखल झाल्याच्या अफवेने शहरातील पानटपऱ्या काही मिनिटांतच बंद झाल्याचे पहावयास मिळाले.

राज्याचे अन्न औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे हे रुजू झाल्यानंतर त्यांनी राज्यात भेसळखोरीविरुद्ध धडाकेबाज कारवाई सुरु केली आहे. अनेक ठिकाणी धाडी टाकून लाखो रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले. सोमवारी नांदेड शहरातील प्रसिद्ध मे. तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्सवर अन्न औषध प्रशासन विभागाने धाड टाकून मुदत संपलेल्या गोळ्या जप्त केल्या आहेत. याप्रकरणी तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्सच्या मालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली. नांदेड शहरातील पानटपऱ्यांवर तंबाखूजन्य खर्रा, गुटखा सर्रासपणे विक्री केला जात आहे. काही पानटपऱ्यांवर अन्न औषध प्रशासन विभागाने यापूर्वी कारवाई केली आहे.

मंगळवारी सकाळी आयुक्त तुकाराम मुंढे हे नांदेड शहरात दाखल झाले असून पानटपऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याच्या अफवा कोणीतरी समाज माध्यमांवर केली. त्यानंतर काही मिनिटांतच नांदेड शहरातील पानटपऱ्या बंद करण्यात आल्या आहेत. काही पानटपरी चालकांनी दुकानातील गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ सुरक्षित ठिकाणी पाठवून पानटपऱ्यांना कुलूप लावले. तुकाराम मुंढे यांच्या धास्तीने मंगळवारी दिवसभर शहरातील पानटपऱ्या बंद होत्या.




## विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी उद्या मतदान

### ४५२ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी तीन उमेदवार निवडणूक रिंगणात असून मतदानासाठी नांदेड जिल्ह्यातील महसूल उपविभागांच्या ठिकाणी एकूण आठ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. मतदान गुरूवार, दि. १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ यावेळेत होणार आहे.

सदर निवडणुकीमध्ये एकूण ४५२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून त्यापैकी २२४ स्त्री मतदार तर २२८ पुरुष मतदार आहेत. या मतदारांमध्ये जिल्ह्यातील महानगरपालिकेचे सर्व सदस्य तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतांचे अध्यक्ष आणि सदस्य यांचा समावेश आहे.

मतदान केंद्राचे ठिकाण व मतदान केंद्रात जोडण्यात आलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे नाव आणि मतदारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. तहसील कार्यालय किनवट येथील मतदान केंद्रात किनवट नगरपरिषद-२४, नगरपंचायत माहूर-१७ असे एकूण ४१ मतदार मतदानाचा हक्क बजावतील याप्रमाणे तहसील कार्यालय हदगाव या मतदान केंद्रावर नगरपरिषद हदगाव-२३, नगरपंचायत हिमायतनगर-१९ एकूण ४२, तहसील कार्यालय भोकर येथील मतदान केंद्रात नगरपरिषद भोकर-२५, नगरपरिषद मुदखेड-२३ एकूण ४८ मतदार, तहसील कार्यालय नांदेड येथील मतदान केंद्रात अर्धापूर नगरपंचायत-१९, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड-८९ असे एकूण १०८ मतदार मतदानाचा हक्क बजावतील.

# नांदेड जिल्ह्याचे जावई राजेंद्र जैन राज्यसभेचे खासदार

## पळसा गावकऱ्यांसाठी लेक कविता मुळे महापौर झाल्यानंतर आता जावई झाले खासदार

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील पळसा येथील लेक कविता मुळे ह्या नुकत्याच महापौरपदी विराजमान झाल्या. त्यानंतर आता राज्यसभेवर या गावाचे जावई राजेंद्र जैन हे खासदार झाले आहेत. यामुळे पळसा गाव चर्चेत आले आहे.



ग्रामदैवत श्री बिरोबा महाराज यांची पावन भुमी असलेल्या पळसा ता. हदगाव येथील गावकरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राजकीय पक्ष बाजुला ठेवून गावातीलच उमेदवाराला प्राधान्य देत यश प्राप्त करुन घेतात. नांदेड येथील उद्योजक उपसरपंच संजय काला यांनी आपले वजन खर्च करीत विद्यमान ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वित्त आयोगासह विविध माध्यमातून विकास कामांना सुरूवात केली आहे. यात गावातील दानशूर मंडळी, युवा वर्ग, भुमिपुत्राच्या लोकसहभागातून शाळा, अंगणवाडी, ग्रामदैवत मंदिर, स्मशानभूमीचा कायापालट झाला असून आजी-माजी लोकप्रतिनिधींनीही निधी उपलब्ध करून देत सहभाग घेतला आहे.

पळसा येथील भगवानराव कोथळकर यांची लेक नांदेड येथील रहिवासी असलेल्या कविता संतोष मुळे यांची नुकतीच नांदेडच्या महापौरपदी निवड झाली. यानंतर नांदेड शहरातील प्रसिद्ध उद्योजक काला परिवार हे पळसा येथील रहिवासी असून विद्यमान उपसरपंच संजय काला यांचे मेव्हुणे पळसा येथील जावई राजेंद्र जैन यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या रिक्त पदावर पक्ष श्रेष्ठींकडून राज्यसभेवर निवड झाली. या निवडीने पळसा गावकऱ्यांसाठी जावयाच्या रुपाने खासदार पदाचा योग प्राप्त झाला आहे. लेक महापौर कविता मुळे नंतर जावई खासदार राजेंद्र जैन यांच्या निवडीमुळे आनंद द्विगुणित झाला असून गावातील विकास कामासाठीच्या आशा पल्लवीत होत आहेत.

# शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा; जलसाठ्यांनी गाठला तळ, पाणी टंचाईचे सावट!

**किनवट (प्रतिनिधी)–** मृग नक्षत्राला सुरुवात होऊनही किनवट आणि परिसर अजूनही कोरडाच असल्याने बळीराजाची चिंता कमालीची वाढली आहे. दरवर्षी जूनच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात पावसाची हजेरी लागते, मात्र यंदा पावसाने दडी मारल्यामुळे खरिपाच्या पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत. पावसाअभावी पाणी टंचाईचे सावट निर्माण झाले आहे.

मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच कमाल तापमानात मोठी वाढ झाली. परिणामी तालुक्यातील मुख्य आणि स्थानिक जलसाठ्यांनी कमालीचा तळ गाठला असून, अनेक गावांमधे तीव्र पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहेत.

मृगाची चाहूल लागताच शेतकऱ्यांनी डिझेल टंचाईच्या काळात दिवसरात्र पेट्रोल पंपांवर तळ ठोकून मोठ्या प्रयत्नाने डिझेल मिळवून पेरणीपूर्व मशागतीची कामे आटोपून घेतली. बी- बियाणे व रासायनिक खतांचा ऐनवेळी तुटवडा निर्माण होण्याची शक्यता लक्षांत घेवून शेतकऱ्यांनी बी-बियाणांसह खतांची साठवणूक करून ठेवली आहे. मृग नक्षत्र कोरडे गेल्यामुळे शेतकरी अद्याप मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. तालुक्यातील लहान-मोठे तलाव, विहिरी आणि कुपनलिकांची पाणीपातळी खालावली आहे. जलस्त्रोतामधील उपयुक्त जलसाठा आता मृत साठ्याच्या उंबरठ्यावर आहे. पावसाअभावी केवळ मानवासाठीच नाही, तर पाळीव जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत चालला आहे.

### कृषी विभागाचा सल्ला

शेतकऱ्यांनी घाईघाईने अपुऱ्या ओलाव्यावर पेरणी करू नये. किमान ७५ ते १०० मिमी समाधानकारक पाऊस झाल्याशिवाय आणि जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्याशिवाय खरिपाच्या पेरण्या करू नका, अन्यथा बियाणे वाया जाण्याची भीती असते, अशी सूचना कृषी विभागाने दिली आहे.

### वरुणराजाला साकडे!

पावसाळ्याला सुरुवात होऊन आठवडा लोटला, परंतु अद्याप किनवट तालुक्यात पेरणीयोग्य पाऊस झाला नसल्याने वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी एका काठीवर बेडूक आणि कडुनिंबाची पाने बांधून परंपरागत पद्धतीने धोंडी धोंडी पाणी दे असे म्हणत साकडे घातले जात आहे. सध्या आभाळ भरून येते, पण वारा सुटल्याने पाऊस हुलकावणी देऊन जात आहे. त्यामुळे आता सर्वांच्या नजरा चातकासारख्या आभाळाकडे लागल्या असून, एका दमदार पावसाची किनवट तालुकावासियांना नितांत गरज आहे.






# पोलीस कॉलनीतील शाळेत एसपी अबिनाश कुमार यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत; शाळा पूर्वतयारी मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात करत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोलीस कॉलनी स्नेहनगर नांदेड येथे शाळा पूर्वतयारी मेळाव्याचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप आणि शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांची उपस्थिती होती.

यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देत शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता व उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा पूर्वतयारी उपक्रम अत्यंत उपयुक्त असून लहान मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी तसेच आनंददायी व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण तयार करण्यासाठी अशा मेळाव्यांचे महत्त्व अधोरेखित केले. मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन, कृतीआधारित शिक्षण, आकर्षक शैक्षणिक खेळ, गाणी, चित्रकला आणि विविध मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मेळाव्यास शिक्षकवृंद, पालक, विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन मुख्याध्यापक मिथुन यादव व सहशिक्षिका स्वप्ना मिनके यांनी केले. सदर मेळावा यशस्वीतेसाठी पोलीस कल्याण विभागाचे निरीक्षक जगदीश भंडरवार, कॉलनी इन्चार्ज उमाकांत दामेकर तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.



**अर्धापूर :** अर्धापूर-तामसा रोडवरील पाटनूर पाटीजवळ सोमवारी रात्री एका मादी बिबट्या व तीन बछडे रस्त्यावरील पाणी पिताना वाहन चालकांना दिसल्याने खळबळ उडाली. यानंतर वनविभागाने वाहन चालकांनी खबरदारी घेऊन वाहन चालवावे असे आवाहन केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आता तेल कमी पडणार नाही?

आपल्या देशामध्ये काही वाढो अथवा न वाढो तेलाच्या किमती मात्र सातत्याने वाढतच असतात. मग त्याला कधी निमित्त तुटवड्याचे असते तर कधी युद्धाचे, पण किंमत वाढीचा आलेख मात्र काही कमी होत नाही. याचा थेट फटका सामान्य माणसाला पोहोचतो. श्रीमंतांच्या गाड्या पूर्वीसारख्याच धावत राहतात, पण याचा विचार कोणी करीत नाही. युद्धबंदीच्या आशेने काही काळ नरमलेले कच्च्या तेलाचे दर नव्याने वाढू लागले असून, तेल आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारतासमोर ऊर्जा सुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर बनले आहे. देशातील वाढती औद्योगिक प्रगती, वाहतूक व्यवस्था आणि ऊर्जा गरजा लक्षात घेता भारताला कच्च्या तेलाचा अखंड पुरवठा सुनिश्चित करणे ही केवळ आर्थिक नव्हे तर सामरिक गरज बनली आहे. भारताची कच्च्या तेलाची आयात सुमारे ४९ लाख बॅरल प्रतिदिन इतकी झाली असून ती आठ टक्क्यांनी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने पारंपरिक पुरवठादार देशांबरोबरच नवीन पर्याय शोधण्यास सुरुवात केली आहे. रशिया, संयुक्त अरब अमिराती आणि इतर तेल उत्पादक देशांशी भारताने वर्षानुवर्षे जपलेले राजनैतिक संबंध आज संकटाच्या काळात उपयुक्त ठरत आहेत. मात्र बदलत्या जागतिक परिस्थितीत ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करणे ही काळाची गरज बनली आहे. याच दृष्टीने व्हेनेझुएलाकडे भारताचे वाढते लक्ष महत्त्वाचे ठरते. अलीकडेच व्हेनेझुएलाच्या कार्यवाहू राष्ट्रपती डेल्सी रॉड्रिग्ज यांच्या भारत दौऱ्याने या संबंधांना नवे परिमाण दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांच्यासोबत झालेल्या चर्चेत ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला. भारत आणि व्हेनेझुएला यांच्यातील संबंध केवळ तेल खरेदी-विक्रीपुरते मर्यादित नसून परस्पर हितसंबंधांवर आधारित दीर्घकालीन भागीदारीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे या घडामोडींमधून स्पष्ट होते. व्हेनेझुएलाचे महत्त्व केवळ तेल उत्पादक देश म्हणून नाही, तर जगातील सर्वाधिक प्रमाणित तेलसाठा असलेल्या राष्ट्रांपैकी एक म्हणून आहे. सुमारे ३०३ अब्ज बॅरल इतका तेलसाठा या देशाकडे असून तो जागतिक साठ्याच्या जवळपास पाचव्या भागाइतका आहे. एवढी प्रचंड संपत्ती असूनही अनेक वर्षे आर्थिक संकट, व्यवस्थापनातील त्रुटी आणि आंतरराष्ट्रीय निर्बंधां-मुळे व्हेनेझुएलाचा तेल उद्योग अडचणीत सापडला होता. मात्र अलीकडील राजकीय बदलांनंतर तेथील तेल निर्यात पुन्हा वेगाने वाढू लागली आहे. विशेष बाब म्हणजे, मे महिन्यात व्हेनेझुएलाच्या एकूण तेल निर्यातीपैकी निम्म्याहून अधिक तेल भारताने खरेदी केले. काही महिन्यांपूर्वीपर्यंत भारताने सलग नऊ महिने व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी केले नव्हते. मात्र जागतिक बाजारातील बदलत्या समीकरणांमुळे आणि चीनच्या आर्थिक मंदीमुळे निर्माण झालेल्या संधीचा भारतीय कंपन्यांनी अचूक लाभ घेतला. रिलायन्स आणि नायरा यांसारख्या कंपन्यांनी व्हेनेझुएलाच्या बाजारपेठेत पुन्हा प्रवेश करून भारतासाठी पर्यायी पुरवठा साखळी मजबूत केली आहे. व्हेनेझुएलाच्या तेलाचे वैशिष्ट्य म्हणजे ते अत्यंत जड आणि चिकट स्वरूपाचे आहे. आखाती देशांतून मिळणाऱ्या हलक्या तेलाच्या तुलनेत त्याचे उत्खनन, वाहतूक आणि प्रक्रिया अधिक खर्चिक व तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असते. हे तेल विक्रीयोग्य बनवण्यासाठी त्यामध्ये नॅफ्थासारख्या हलक्या हायड्रोकार्बनचे मिश्रण करावे लागते. त्यामुळे व्हेनेझुएलाला अशा पदार्थांची आयात करणे अपरिहार्य ठरते. याच ठिकाणी भारताची ताकद पुढे येते. जगातील सर्वात मोठ्या रिफायनिंग केंद्रांपैकी एक म्हणून भारताची ओळख आहे. गुजरात, महाराष्ट्र आणि इतर राज्यांतील विशाल रिफायनऱ्या केवळ देशांतर्गत गरजा भागवत नाहीत, तर मोठ्या प्रमाणावर नॅफ्थाचे उत्पादन आणि निर्यातही करतात. रिलायन्स इंडस्ट्रीज, इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम यांसारख्या कंपन्या या क्षेत्रात जागतिक स्तरावर स्पर्धात्मक स्थान राखून आहेत. परिणामी, भारत आणि व्हेनेझुएला यांचे संबंध केवळ खरेदीदार-विक्रेता या चौकटीत अडकलेले नाहीत. भारताला कच्च्या तेलाचा पर्यायी आणि विश्वासार्ह स्रोत मिळू शकतो, तर व्हेनेझुएलाला आपल्या तेल उद्योगातील सर्वात मोठ्या तांत्रिक अडचणीवर मात करण्यासाठी सक्षम भागीदार लाभू शकतो. ही परस्परपूरकता दोन्ही देशांसाठी लाभदायक ठरणारी आहे. जागतिक ऊर्जा राजकारण दिवसेंदिवस गुंतागुंतीचे होत असताना भारताने ऊर्जा सुरक्षेसाठी बहुआयामी धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. व्हेनेझुएलासोबत वाढणारे सहकार्य हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल मानावे लागेल. तेल पुरवठ्याच्या बाबतीत कोणत्याही एका प्रदेशावर अवलंबून राहण्याऐवजी विविध स्रोत निर्माण करण्याची भारताची रणनीती दीर्घकालीनदृष्ट्या अधिक सुरक्षित आणि शाश्वत ठरेल. ऊर्जा सुरक्षेच्या या नव्या समीकरणात व्हेनेझुएला भारतासाठी केवळ तेलाचा पुरवठादार नसून एक महत्त्वाचा सामरिक भागीदार म्हणून उदयास येत आहे.

# झाशीची राणी लक्ष्मीबाई: तळपत्या सूर्याचा प्रकाश



आज इतिहासातच नाही तर जगात झाशीची राणी लक्ष्मीबाईचे नाव मोठ्या स्वाभिमानाने घेतल्या जाते. कारण कमी वयात देशासाठी लढा उभारून इंग्रजांशी दोन-दोन हात करून संघर्ष केला यात लक्ष्मीबाईची महानता अजरामर आहे. झाशीची राणी लक्ष्मीबाईचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी (वाराणसी) येथे १९ नोव्हेंबर १८३५ ला झाला. लक्ष्मीबाईचे मूळ नाव मणिकर्णिका होते.

लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत तांबे हे पुण्याच्या पेशव्यांच्या आश्रयाला होते. मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गुढे गावचे होते. नंतर काशी येथे स्थायी झाले व तिथे लक्ष्मीबाईंचा जन्म झाला. उत्तर भारतातील झाशी राज्यातील महाराज गंगाधरराव नेवलेकर यांच्याशी १९ में १८४२ ला विवाह झाला आणि लक्ष्मीबाई झाशीची राणी बनली. परंतु २१ नोव्हेंबर १८५३ रोजी महाराज गंगाधरराव नेवलेकर यांचे निधन झाले तेव्हा राणी अवघ्या १८ वर्षांच्या होत्या.तथापि राणीने आपला संयम आणि धैर्य राखले आणि बाळ दामोदरच्या लहान वयामुळे राणी लक्ष्मीबाईने राज्याचा ताबा घेतला.

लक्ष्मीबाई एकोणिसाव्या शतकातील झाशी राज्याच्या महाराणी होत्या. १८५७ च्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रगण्य तेजस्वी, महाप्रतापी आणि कमी वयातील बहादुर सेनानी होत्या. ७ मार्च १८५४ रोजी ब्रिटिश सरकारने झाशीला ब्रिटिश साम्राज्यात सामील होण्याचे आदेश देणारे अधिकृत राजपत्र जारी केले. ब्रिटीश अधिकारी लिसचा हा आदेश राणी लक्ष्मीबाईने ऐकल्यावर तळ पायाची आग मस्तकात गेली व आदेश पाळण्यास नकार दिला आणि मी झाशी देणार नाही असे जाहीर केले व झाशी हे बंडाचे केंद्र बनले. सर ह्यु रोज यांनी २२ मे १८५८ रोजी काल्पीवर हल्ला केला. परंतु राणी लक्ष्मीबाईने आपल्या पराक्रमाने ब्रिटिशांना पराभूत केले. यामुळे ब्रिटिश तिलमीला झाले व पुन्हा काल्पीवर हल्ला केला आणि राणीचा पराभव झाला. या पराभवानंतर रावसाहेब पेशवे, बांद्याचे नवाब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई आणि इतर महत्वाचे सैनिक गोपाळपूरला जमले. यावेळी राणीने ग्वाल्हेर ताब्यात घेण्याचा सल्ला दिला.

लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांनी बंडखोर सैन्यासह ग्वाल्हेरवर कूच केले व ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला आणि ग्वाल्हेरचे राज्य पेशव्यांच्या ताब्यात दिले. १८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीतही शिपायांचा उद्रेक झाला व केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून सोडले. २२ मे १८५८ च्या कल्पीच्या लढाईनंतर राणी ३०-३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या. तेथे स्वस्त न बसता लक्ष्मीबाईंनी आपल्या सैन्याची कवायत नियमित सुरू ठेवली. इंग्रजांना रोखण्यासाठी कशा प्रकारे मोर्चे बांधणी करावी या विषयी त्यांनी चर्चा केली. अचानक याचवेळी १७ जून १८५८ रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथ सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ कोटा की सराय येथे येऊन पोहोचला व त्यांनी त्वरित हल्ला चढवला. अशा परिस्थितीत लक्ष्मीबाईने रणांगणात धाव घेतली आणि लक्ष्मीबाईने ब्रिटिश शिपायांना तलवारीने सपासप कापत सामोरं जात होत्या.

विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांच्या सैनिकां-मध्ये आणखी जोश आला व ब्रिटिश सैन्याला छाटून काढले. अशा परिस्थितीत इंग्रज अधिकारी स्मिथचे सैन्य मागे हटणार होते. परंतु घात झाला आणि नव्या दमाची एक फौज बाजूच्या टेकडीवरून चालून आली.अशा परिस्थितीत आपला टिकाव लागणार नाही हे पाहुन स्वारांनिशी बाहेर पडल्या. थोडे पुढे जाताच एका ओढ्यापाशी त्यांचा राजरत्न नावाचा (हा नवीन घोडा होता) घोडा अडला.नेहमीचा सारंगी नावाचा घोडा शेवटच्या लढाईत त्यांच्याबरोबर नव्हता. अशा परिस्थितीत काही केल्या घोडा ओढा ओलांडत नव्हता. इंग्रजांशी लढत असताना राणी लक्ष्मीबाई रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळल्या.परंतु पुरूषी वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखू शकले नाहीत व इंग्रज पुढे निघून गेले. घायाळ झालेल्या राणी लक्ष्मीबाई यांना सेवक रामचंद्र देशमुखांनी फुलबाग येथील बाबा गंगादास यांच्या मठात आणले.आपला देह इंग्रजांच्या हाती लागू नये अशी त्यांची इच्छा होती.

फुलबाग येथे बाबा गंगादास यांच्या मठात तात्या टोपे, रामचंद्रराव देशमुख, काशीबाई कुनविन, गुलमोहम्मद, बांदा नवाब बहादुर अली आणि दामोदर राव यांनी मुखाग्नी दिली. अशा प्रकारे महान योध्दा राणी लक्ष्मीबाई यांनी वीरमरण पत्करून वयाच्या तेविसाव्या वर्षी प्राणज्योत मालवली. राणी लक्ष्मीबाईचा स्वर्गवास १७ जून १८५८ ला झाला. परंतु इंग्रज सरकारने राणी लक्ष्मीबाईना १८ जूनला मृत घोषित केले. त्यामुळे दरवर्षी १८ जूनला पुण्यतिथी साजरी करण्यात येते.जोपर्यंत सूर्य-चंद्र, आकाश -पाताळ आहे तोपर्यंत झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे नाव अमर राहील. देशात झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची प्रेरणा निरंतर आपल्या हृदयात रहावी यासाठी त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशात वृक्ष लागवड व्हायला हवी.कारण असे जर झाले तर आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानांत, फुलात, फळात झाशीची राणी लक्ष्मीबाई याचे दर्शन अवश्य होईल.राणी लक्ष्मीबाईना कोटी कोटी प्रणाम.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# वाणी वैभवातूनच मानवाची उन्नती



मनुष्य प्राप्त करू शकणाऱ्या चौसष्ट कलांपैकी वक्तृत्वकला ही सर्वात महत्त्वाची कला आहे. वाणीवैभव असणारी माणसे जगात सर्वात श्रीमंत असतात. मुखदुर्बलता असण-री व वायफळ चर्चा करणारी किंवा आपल्या वाणीमुळे इतरांची मने दुखतील असे भयंकर बोलणारी माणसे खऱ्याअर्थाने दरिद्री असतात. आपल्याला प्राप्त झालेल्या वाणीवैभवातून इतरांची मने जिंकता आली पाहिजेत. प्राप्त ज्ञान आपल्याला अतिशय सुत्रबद्ध पद्धतीने आणि रसाळ वाणीने गरजवंतापर्यंत पोहचविता आले पाहिजे. दहा हजार माणसात एक वक्ता असतो आणि दहा हजार वक्त्यात एक वक्ता असा असतो की, जो श्रोत्यांचे पूर्ण समाधान करतो. विविध वक्त्यांचे परिश्रम, मेहनत, जिद्द, चिकाटी व अंतिम उद्देश लक्षात घेऊन अभ्यास केला तर एक मजेदार अनुभव येईल. श्रोत्यांना शब्दसामर्थ्याने मंत्रमुग्ध करणाऱ्या वक्त्याचा अंतिम उद्देश काय? हे मात्र खूप महत्वाचे.

आपल्याला या क्षेत्रात अगदी दिग्गज असणाऱ्या आणि होऊन गेलेल्या वक्त्यांचा सारांश रूपाने विचार करावयाचा आहे. महाभारताचे निर्माते व्यास यांनी महाभारत हा ग्रंथ अविरतपणे सांगितला आणि त्यासाठी गणेशानी तेवढेच तत्परतेने लेखनिकाचे कार्य केले असे सांगितले जाते. वक्तृत्वाचा उत्तम नमुना म्हणून व्यासांनी केलेल्या या कार्याचा उल्लेख केला जातो. व्यासांनी ज्या ठिकाणी बसून महाभारत सांगितले त्या जागेला व्यासपीठ म्हटले जाते. त्यामुळेच वक्तृत्वाच्या माध्यमातून जेंव्हा विचार व्यक्त केले जातात. वक्त्यांच्या त्या जागेलाही व्यासपीठ म्हणून संबोधन्याची प्रथा निर्माण झाली. ती जागा प्रज्ञावंतांची आहे. ज्ञानसूर्याची आहे, असे समजले जाते. भगवान श्रीकृष्ण भारतीय इतिहासातील उत्कृष्ठ वक्ते समजले जातात. त्यांनी साधलेला संवाद अजरामर झाला. कुरुक्षेत्रावरील विशद केलेली भगवत गीता त्यांच्या वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुनाच होता. पांडवाकडे श्रीकृष्णासारखा उत्तम वक्ता असल्यामुळे त्यांचा विजय होऊ शकला. कौरवांचा विजय का होऊ शकला नाही हे सांगण्याची आवश्यकता नाही.

बुध्दाने जगाला दुखा-पासून मुक्त होण्याचे तत्वज्ञान सांगितले. भरकटलेल्या जीवाला जीवन मार्ग सांगितला. त्यांचे असंख्य अनुयायी तयार झाले. ते आजही बुद्धाच्या वाणीवैभवाने प्रभावित होऊन कार्य करीत आहेत. बुद्ध आणि काश्यप यांचे तर गुरूशिष्याचे उत्तम उदा. आहे. ज्या जंगली लोकांच्या प्रबोधनासाठी आपण जाणार आ-होत ते आपल्याला शिव्या देणार असतील, मारणार असतील, आपला जीव घेणार असतील तरी मी तिथे प्रबोधनासाठी जाणारच, कारण तिथेच माझ्या ज्ञाना-ची खरी गरज आहे, या विचारावर ठाम असणाऱ्या काश्यपाची किती अढळ श्रद्धा असेल? आपल्या गुरुवर, ज्ञानावर आणि वक्तृत्वावर. त्यामुळेच बुद्धास-ारखे गुरू व काश्यपासारखे शिष्य निर्भीड वक्तृत्वाचे धनी होऊन ते इतिहासात अजरामर झाले. आपल्या वक्तृत्वाला सत्य प्रतिपादनाची जोड दिली.

इ. स. पूर्व ४६६ मध्ये सिसलीतील सिराक्यूझ या ग्रीक वसाहतीत लोकशाही शासनप्रणाली अस्तित्वात आली. हद्दपार केलेल्या लोकांनी अत्याचार केलेल्या लोकांवर खटले भरले, तेव्हा त्यांची बाजू मांडण्यासाठी त्यांना उत्कृष्ठ वक्ता, वकील हवा होता, तेंव्हा सिसिलियन ग्रीक कोरॅकने ती जबाबदारी स्वीकारली.त्याने वक्तृत्व कलेसाठी एक सुत्रबद्ध पद्धती तयार केली. व्याख्यान करताना प्रास्ताविक, सुसंगत कथन, महत्वपूर्ण टीका, मुद्देसूद सारांश, संक्षिप्त आढावा अशी व्याख्यानाची रचना असावी असे त्याचे मत होते. इ. स. पूर्व ३८४ ला प्रगटलेल्या डेमोस्थेनिसने जगाला दाखवून दिले की, वक्ता हा जन्म घेत नसतो, तर तो त्याच्या स्वयंप्रेरणेने व अतिकष्टाने तयार होत असतो. त्याचा पारंपरिक व्यवसाय तलवारी तयार करण्याचा असल्यामुळे आपले शब्द तलवारीच्या धारेप्रमाणे असावे या विचारावर तो ठाम होता, पण त्याचा आवाज बारीक व उच्चार स्पष्ट नसल्याने शब्दाला धार प्राप्त होत नव्हती.

आपल्या 'रेटारीक' ग्रंथात नितीपर, करुण, रसोत्पादक व तार्किक हे तीन भाव निर्माण करणारे वक्तृत्व असावे असे ऑरिस्टाटल यांनी आपले मत मांडले.त्याच्या मते, नीतीचा आधार घेऊन करून रसाने ओतप्रोत असलेले तार्किकतेच्या कसोटीवर सादर केले जाते त्याला भाषण असे म्हणतात. त्याने जगज्जेत्या सिकंदरला वक्तृत्वकलेची शिकवण दिली, त्यामुळेच त्याच्या मनात जग जिंकण्याची ईर्षा निर्माण झाली व पराक्रमी अनुयायांची शृंखला तो निर्माण करू शकला. सिसरो रोममधला प्रसिद्ध वक्ता होता.'द ओरेटर' नावाच्या आपल्या ग्रंथात तो म्हणतो. वक्ता हा विद्वान, व्यासंगी, भाषाप्रभू, श्रोत्यांची नाडी ओळखणारा, त्यांना जाणणारा अस-ावा. तो जागृत, दक्ष, संवेदनशील, निरीक्षक असावा, त्यामुळे त्याचा प्रभाव निर्माण होतो, त्याचे भाषणही प्रभावी होते. त्याने अथेन्स व ऱ्होड्स येथील वक्तृत्व विद्यालयातून भाषणकलेचे शिक्षण व प्रशिक्षण घेत-ले.आपल्या वाणीवैभवातून त्याने श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य केले.

इंग्लंडसारख्या लोकशाहीच्या प्राचीन भूमीत अनेक नामवंत वक्ते होऊन गेले. अशाच वक्त्यांच्या नामावलीतील प्रतिभा संपन्न वक्ता म्हणून जगप्रसिध्द झालेला, भौतिकशास्त्रज्ञ, संशोधक तरी-ही मायकेल फेराडे होय. त्याच्या मते वक्त्याने आपले पूर्ण कौशल्य पणाला लावून श्रोत्यांचे मन, मेंदू आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी विचारांचे प्रगटीकरण करावे. श्रोत्यांना शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता वाटावी. त्यांची उत्कंठा शिगेला पोहचावी. यादृष्टीने रचना असावी. वक्ता निर्भय, मनमोकळा एकाग्रचित्त व ठामपणे विषयाचे प्रतिपादन करणारा, तसेच तो स्पष्ट विचारांचा व निसंदिग्ध ज्ञानाचा अधिकारी असावा. वक्तृत्वकलेला गौरव प्राप्त करून देण्यासाठी हे विचार प्रत्यक्षात आणले गेले पाहिजे.

एकेकाळी जर्मनीच्या सैन्यात साधा सैनिक अस-लेला हिटलर फक्त स्वतःच्या वक्तृत्व सामर्थ्यावर जर्मन लोकांचा हृदयसम्राट झाला. आवेशपूर्ण भाषणाचा उत्तम नमुना त्याने आपल्या साधनेतून प्राप्त केला होता. वक्तृत्वाने स्वतःचे भविष्य बदलता येते, अनेकांची आपल्या वाणीवैभवातून कारण कर्णतृप्तीही करता येते. अनेकांचे विचार सकारात्मक दिशेने नेता येतात. मानवी संपत्ती संस्कारशील, विचारक्षम व कार्यक्षम बनविता येते, पण आपल्या विषारी वाणीने सर्वजगात दहशत निर्माण करून जगाला विनाशाच्या खाईत नेण-ारा हिटलर एक क्रूरकर्मा म्हणूनच जगाच्या स्मरणात राहतो. हिटलरचे वक्तृत्व जर्मनी बरोबरच जगाला विनाशाच्या खाईत नेणारे ठरले. हिटलरच्या पावलावर पाऊल ठेवून बेनिटो मुसोलिनी आपल्या वक्तृत्वाच्या बळावर इटालीचा हुकूमशहा झाला. आपला शब्द प्रमाण मानायला लोकांना बाध्य करण्याची कला त्याच्या शब्दात होती. त्याने कार्ल मार्क्स, सोरेल, लुई ग्लानकी या विचारवंतांचे साहित्य अभ्यासले. समाजव-ादी कामगार नेता ते इटालीचा हुकूमशाह हा त्याचा चित्तथरारक प्रवास. कार्य हिटलरसारखे आणि अंतही हिटलर सारखाच.

वक्तृत्वाची आवड असणारे युवा मित्र, या सर्व वक्त्यांच्या कार्यकर्तृत्वावरून आपल्या वाणीवैभवाचा उपयोग आपण कसा करायचा हे तुम्हीच ठरविले पाहिजे. जेंव्हा आपले वक्तृत्व आणि विचार मनुष्यरूपी राक्षसांचे गुलाम होतात तेंव्हा मानवी जीवन रसातळाला जाण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात असते. आपल्यातील या गुणवैभवाने मनुष्य जीवनाला समृध्द करणे हाच मनुष्यधर्म आहे याची जाणीव आपणास व्हावी हीच अपेक्षा.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# सहल: क्षण आनंदाचे, आठवणी आयुष्यभराच्या!

दरवर्षी १८ जून रोजी आंतरराष्ट्रीय सहल दिवस साजरा केला जातो. हा दिवस निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवण्यासाठी, ताजी हवा अनुभवण्यासाठी आणि कुटुंब तसेच मित्रांसोबत मोकळ्या वातावरणात आनंदाचे क्षण व्यतीत करण्यासाठी समर्पित आहे. आधुनिक जीवनशैलीतील वाढता ताण, धावपळ आणि व्यस्त दिनक्रम यामुळे माणूस निसर्गापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत सहल हा मनाला नवचैतन्य देण-ारा आणि निसर्गाशी पुन्हा नाते जोडणारा एक सुंदर अनुभव ठरतो.

आंतरराष्ट्रीय सहल दिवसाचा उगम १९ व्या शतकातील फ्रान्समध्ये झाला असे मानले जाते. फ्रेंच क्रांतीनंतर लोकांना औपचारिकता आणि सामाजिक बंधनांमधून थोडा विरंगुळा मिळावा, यासाठी सहलींची संकल्पना लोकप्रिय झाली. खुल्या वातावरणात कुटुंबीय आणि मित्रांसोबत वेळ घालवणे, एकत्र भोजन करणे आणि निसर्गाचा आनंद घेणे ही परंपरा हळूहळू जगभर पसरली.

या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे दैनंदिन जीवनातील ताणतणावातून काही काळ बाहेर पडून निसर्गाच्या जवळ जाणे. सहलीमुळे मन प्रसन्न होते, मानसिक आरोग्य सुधारते आणि नवीन ऊर्जा मिळते. हिरवीगार झाडे, डोंगर, नद्या, तलाव आणि पक्ष्यांचा मधुर किलबिलाट यांचा अनुभव घेताना मनाला शांतता आणि समाधान लाभते.

सहल ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ज्ञानवृद्धीचेही प्रभावी माध्यम आहे. विविध ऐतिहासिक स्थळे, सांस्कृतिक केंद्रे, संग्रहालये आणि नैसर्गिक स्थळांना भेट देऊन अनेक नवीन गोष्टी शिकता येतात.



तसेच विविध संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धतींची ओळख होते. त्यामुळे सहल व्यक्तीच्या ज्ञानात आणि अनुभवात मोलाची भर घालते.

सहलीमुळे मैत्री आणि कौटुंबिक नातेसंबंध अधिक दृढ होतात. एकत्र प्रवास करणे, खेळणे, गप्पा मारणे आणि आनंदाचे क्षण वाटून घेणे यामुळे परस्परांतील आपुलकी वाढते. सहकार्य, संघभावना आणि सामाजिक जाणीव यांसारखे गुणदेखील विकसित होतात.

सहल ही निसर्गाशी जवळीक साधण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. दैनंदिन जीवनातील धकाधकीत माणूस अनेकदा निसर्गापासून दूर जातो. सहलीच्या निमित्ताने हिरवीगार वनराई, उंच पर्वतरांगा, खळखळणाऱ्या नद्या, अथांग समुद्र आणि विविध नैसर्गिक सौंदर्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळते. निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवल्याने मन प्रसन्न होते, तणाव कमी होतो आणि मानसिक शांतता लाभते. तसेच पर्यावरणाचे महत्त्व समजून घेण्यास मदत होते. झाडे, वन्यजीव आणि नैसर्गिक संपत्ती यांचे संवर्धन करणे किती आवश्यक आहे याची जाणीव निर्माण होते. त्यामुळे सहल केवळ मनोरंजनापुरती मर्यादित राहत नाही, तर ती निसर्गप्रेम आणि पर्यावरण संवर्धनाची भावना रुजवणारी एक महत्त्वाची अनुभवयात्रा ठरते.

सहल ही ज्ञानप्राप्तीचे एक प्रभावी साधन आहे. पुस्तकांमधून मिळणारे सैद्धांतिक ज्ञान सहलीमुळे प्रत्यक्ष अनुभवातून अधिक स्पष्ट आणि समृद्ध होते. ऐतिहासिक स्थळांना भेट दिल्याने आपल्या इतिहासाची, परंपरांची आणि महान व्यक्तींच्या कार्याची माहिती मिळते. संग्रहालये, विज्ञान केंद्रे आणि सांस्कृतिक वारसा स्थळांमधून विविध विषयांबद्दल नवीन ज्ञान प्राप्त होते. तेथील वस्तू, प्रदर्शन आणि माहितीफलक पाहून अनेक गोष्टी सहज समजतात आणि दीर्घकाळ स्मरणात राहतात. तसेच विविध प्रदेशांची संस्कृती, भाषा, कला आणि जीवनशैली यांची ओळख होते. त्यामुळे सहल केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न राहता ज्ञानवृद्धी करणारी आणि दृष्टीकोन व्यापक करणारी एक समृद्ध शैक्षणिक अनुभवयात्रा ठरते.

सहल ही मैत्री अधिक घट्ट आणि दृढ करण्याचे एक उत्तम माध्यम आहे. सहलीदरम्यान मित्र एकत्र प्रवास करतात, विविध खेळ खेळतात, गप्पा मारतात आणि अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. या सर्व अनुभवांमुळे एकमेकांना अधिक जवळून ओळखण्याची संधी मिळते. आनंदाचे क्षण वाटून घेताना तसेच अडचणीच्या प्रसंगी एकमेकांना मदत करताना मित्रांमधील विश्वास आणि सहकार्याची भावना वाढते. सहलीमुळे परस्परांतील आपुलकी अधिक दृढ होते आणि नातेसंबंध अधिक मजबूत बनतात. एकत्र घालवलेले हे आनंददायी क्षण आयुष्यभर स्मरणात राहतात. त्यामुळे सहल केवळ मनोरंजनाचा अनुभव नसून मैत्रीचे बंध अधिक घट्ट करणारी आणि सामाजिक संबंध समृद्ध करणारी एक सुंदर संधी ठरते.

सहल ही तणावमुक्तीचा एक प्रभावी मार्ग आहे. दैनंदिन जीवनातील धकाधकी, अभ्यासाचा ताण, कामाचा दबाव आणि सततची घाईगडबड यामुळे मन थकून जाते. अशा वेळी सहलीच्या माध्यमातून निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवल्यास मनाला मोठा आराम मिळतो. हिरवळ, स्वच्छ हवा, शांत वातावरण आणि नैसर्गिक सौंदर्य यामुळे मन प्रसन्न होते आणि तणाव कमी होतो. सहलीदरम्यान मित्र-मैत्रिणी किंवा कुटुंबासोबत घालवलेले आनंदाचे क्षण मनात उत्साह आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. खेळ, गप्पा, हास्य आणि मनोरंजनामुळे मानसिक थकवा दूर होतो. त्यामुळे सहल ही केवळ आनंद देणारी नसून मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत करणारी एक उपयुक्त आणि आवश्यक क्रिया ठरते.

सहल ही संघभावना विकसित करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. सहलीदरम्यान अनेक सामूहिक उपक्रम पार पडतात, ज्यामध्ये सर्वांनी एकत्र येऊन सहभाग घ्यावा लागतो. प्रवासाची तयारी, नियोजन, खेळ, स्पर्धा आणि विविध कार्यक्रम यांमध्ये एकमेकांचे सहकार्य आवश्यक असते. अशा परिस्थितीत एकत्र काम करण्याची सवय लागते आणि प्रत्येकाची जबाबदारी समजते. इतरांना मदत करणे, अडचणीच्या वेळी साथ देणे आणि समूहातील नियमांचे पालन करणे यामुळे सहकार्याची भावना दृढ होते. प्रत्येकाच्या मतांचा आदर करून सामूहिक निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. त्यामुळे सहल ही केवळ मनोरंजनाची संधी नसून संघभावना, सहकार्य आणि सामाजिक एकोपा वाढवणारी महत्त्वाची अनुभवयात्रा ठरते.

सहल ही मानसिक तणाव दूर करून मनाला ताजेतवानेपणा आणि आनंद देण-ारी क्रिया आहे. ती व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देते आणि जबाबदारी, स्वावलंबन तसेच संघभावना यांसारखे गुण विकसित करते. त्यामुळे सहल प्रत्येकाच्या जीवनात आनंद, प्रेरणा आणि समृद्ध अनुभव घेऊन येणारी एक आवश्यक आणि अविस्मरणीय बाब आहे. म्हणूनच आपण सर्वांनी सहलीचे महत्त्व ओळखून तिचा आनंद घेतला पाहिजे आणि त्यातून मिळणारे अनुभव जीवनात आत्मसात केले पाहिजेत.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो.९७६७८३०४९८

# नांदेड जिल्ह्यात भूमी अभिलेख विभागाची तीन नवीन कार्यालये कार्यान्वित

## जनसामान्यांच्या सेवेसाठी कामकाजाला सुरुवात



**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागा-मार्फत भूमी अभिलेख विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने मंजूर करण्यात आलेल्या 'सुधारित आकृतीबंधा'ची अंमलबजावणी १५ जून २०२६ पासून राज्यभरात अधिकृतपणे करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे नांदेड जिल्ह्यात तीन नवीन कार्यालये १५ जूनपासून प्रत्यक्ष कार्यान्वित झाली आहेत. यामुळे जमिनीच्या मोजणी आणि इतर तांत्रिक कामांसाठी नागरिकांना अधिक सोईचे होऊन प्रशासकीय कामात मोठी सुलभता येणार आहे.

प्रशासकीय सुधारणेचा मोठा निर्णय ११ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, भूमी अभिलेख विभागातील मंजूर पदांचा सर्वकष आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार विभागातील ९ हजार ६८९ पदांमध्ये वाढ करून १० हजार ६८३ पदांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला. विभागाची व्याप्ती वाढवणे आणि सामान्य नागरिकांना जमिनीच्या मोजणीसह अन्य तांत्रिक व अर्धन्यायिक कामांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी वारंवार येण्यापासून मुक्ती मिळावी, या हेतूने हे नवीन बदल करण्यात आले आहेत.

नांदेड जिल्ह्यातील नागरिकांची वाढती गरज आणि कामाचा व्याप विचारात घेऊन या सुधारित आकृतीबंधानुसार जिल्ह्यात तीन नवीन कार्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. या कार्यालयांच्या निर्मितीमुळे आता संबंधित तालुक्यातील किंवा परिसरातील नागरिकांना आपल्या परिसराजवळच भूमी अभिलेख विषयक सेवा उपलब्ध होणार आहेत. यामुळे कामाचा वेग अधिक वाढेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (म. राज्य) पुणे यांच्या आदेशानुसार, उपसंचालक भूमी अभिलेख नांदेड, प्रदेश नांदेड व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड क्र. २ मुख्यालय भोकर आणि नगर भूमापन अधिकारी नांदेड या तीन नवनिर्मित कार्यालयांचे कामकाजास उपसंचालक भूमि अभिलेख किशोर जाधव छत्रपती संभाजीनगर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड श्रीमती सीमा देशमुख यांचेकडून कार्यान्वित करून सुरवात करण्यात आली आहे.

१५ जून रोजी सकाळपासून या कार्यालयांमध्ये कामकाजाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. कार्यालय सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, जमिनीच्या मोजणीसह इतर महसुली कामांमध्ये सुलभता येईल व कामे जलद गतीने होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या कार्यालयांच्या सुरुवातीमुळे महसूल प्रशासनाचे विकेंद्रीकरण होऊन जनतेच्या कामांना अधिक गती मिळेल, असे मत स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही व्यक्त केले आहे. नागरिकांनी आता आपल्या कामांसाठी नवीन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# 'पुस्तकांचे गाव' उपक्रमासाठी ३० जूनपर्यंत प्रस्ताव पाठवावेत -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)** –वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'पुस्तकांचे गाव' या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्ह्यातून एका गावाची निवड करण्यात येणार आहे. इच्छुक ग्रामपंचायती, संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांनी ३० जून २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा मराठी भाषा समितीचे अध्यक्ष राहुल कर्डीले यांनी केले आहे.

राज्यात पुस्तकांचे गाव निर्माण करताना सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी, देवस्थानांनी, ग्रामपंचायतींनी, संस्थांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोणत्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता या उपक्रमात सहभागी व्हावे. या उपक्रमात व्यापक लोकसहभाग असणे आवश्यक असून त्याबाबतचा उल्लेख स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ठरावामध्ये असणे बंधनकारक आहे. प्रत्येक ग्रंथदालनाचे क्षेत्रफळ किमान १५० चौ. फूट असावे. तसेच संबंधित जागा विनामूल्य उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. यासाठी किमान पाच वर्षांचा करार करणे बंधनकारक राहणार आहे. गावातील परिस्थितीनुसार उपलब्ध दालनांची संख्या व आकारमान कमी-जास्त असू शकते. त्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य मराठी विकास संस्था घेणार आहे.

'पुस्तकांचे गाव' निवडीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. त्यानुसार ही योजना फक्त ग्रामपंचायत, नगरपंचायत व 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. संबंधित ग्रामपंचायत, नगरपंचायत अथवा नगरपरिषदेचा ठराव आवश्यक राहील. शासनाने घोषित केलेली पर्यटनस्थळे, तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक वारसा असलेली गावे, राज्य किंवा केंद्र संरक्षित स्मारके असलेली गावे तसेच संत गाडगेबाबा, आदर्श गाव, तंटामुक्ती, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आदी राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त गावांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच साहित्यिक किंवा वाङ्मयीन चळवळीची परंपरा असलेल्या गावांचाही विचार केला जाणार आहे.

प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा मराठी भाषा समितीकडून प्रत्यक्ष पाहणी करून पात्रतेचा अहवाल सादर करण्यात येईल व त्यानंतर गावाची अंतिम निवड करण्यात येईल. निवड झालेल्या गावात सुरुवातीला किमान दहा ग्रंथदालने सुरू करण्यात येतील. या दालनांसाठी आवश्यक आवर्ती व अनावर्ती खर्च शासनाकडून करण्यात येणार आहे. उपलब्ध जागा, वाचन संस्कृतीची परंपरा आणि पर्यटन विकासाची क्षमता या बाबींचा विचार करून गावाची निवड केली जाईल. केवळ पुस्तक विक्री किंवा प्रदर्शनापुरता हा उपक्रम मर्यादित न राहता वाचन प्रेरणा, साहित्यिक उपक्रम, ग्रंथदालने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्ञानकेंद्र उभारून मराठी साहित्यविश्वाचे दर्शन घडविणे आणि पर्यटन विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

अधिक माहिती, अटी व शर्तींसाठी मराठी भाषा विभागाचा ३० जानेवारी २०२६ रोजीचा शासन निर्णय पाहावा. इच्छुक मंडळांनी, देवस्थानांनी, ग्रामपंचायतींनी, संस्थांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव दि. ३० जून २०२६ पर्यंत संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या नावे जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, व डिजिटल उपकेंद्र नांदेड बहुउद्देशीय सांस्कृतिक संकुल श्री गुरुगोबिंदसिंगजी स्टेडियम परिसर, नांदेड येथे तीन प्रतींमध्ये सादर करावेत.

या उपक्रमासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नांदेड यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, अधिक माहितीसाठी ८३५५९६६५६१ किंवा ९८३४२७६२५७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्रीवेदचा अकरावा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहरातील भागधारकांच्या, ठेवीदारांच्या विश्वासास पात्र ठरलेली श्रीवेद मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड या संस्थेने बाराव्या वर्षात पदार्पण केल्याने दि. १३ जून २०२६ रोजी उत्साहात वर्धापन दिन साजरा केला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष एस. जी. चांडोळकर यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मारोतीराव कंठेवाड, कार्यकारी संचालिका सौ. सविता कंठेवाड, संचालक रमेश तोटावार, नागोराव पडलवार, नागनाथराव अनंतवाड आणि सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. वर्धापन दिनानिमित्त संस्थेस शुभेच्छा देण्यासाठी माजी एस. पी. मिठेवाड, माजी न्यायाधीश विजय शिकची, इंजि. पालेपवाड, गणपतराव तोटावार, डॉ. वडजे, बागले, पल्लेवाड, कुमारे याशिवाय अनेक भागधारक, ठेवीदार व कर्जदार या निमित्ताने संस्थेच्या आनंदनगर मुख्य शाखेस भेट देऊन संस्थेची प्रगती व्हावी म्हणून शुभेच्छा व्यक्त केल्या.

तसेच संस्थेच्या घणसोली नवी मुंबई, बिदर (कर्नाटका), नायगाव व भोकर या शाखांना भेट देऊन अनेक सभासदांनी, ठेवीदारांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रतिमा पूजनाच्या वेळी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे संस्थेच्या वतीने कार्यकारी संचालिका सौ. सविता कठेवाड यांनी आभार व्यक्त केले.

# एमजीएममध्ये इंग्लिश लँग्वेज क्लबतर्फे वादविवाद स्पर्धा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– एमजीएम अभियांत्रिकी महाविद्या-लयातील इंग्लिश लँग्वेज क्लब तर्फे महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात नुकतीच वादविवाद स्पर्धा पार पडली.

स्पर्धेसाठी प्रोफेसर सत्पालसिंग गिल यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या वादविवाद स्पर्धेतून विद्यार्थ्यांचे संभाषण तसेच चिकित्सक विचार कौशल्य वाढविण्याचा उद्देश असल्याचे मत प्रास्ताविकात क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. चंदनकुमार सोमवंशी यांनी सांगितले. या स्पर्धेत एकूण ३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत प्रथम वर्ष अभियांत्रिकीची श्रद्धा मांडलीक विजेती तर कुमुदावली कुणीगलकर उपविजेती ठरली. कार्यक्रमास परीक्षक म्हणून प्रा. सत्पालसिंग गिल आणि प्रा. विजय कांबळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमास ग्रंथपाल डॉ.गोविंद हंबर्डे , प्रा. मुरारी पावडे आणि प्रथमवर्ष प्रमुख प्रा.राहूल शर्मा आदींची उपस्थिती होती.

# सिडकोतील नृसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळेत पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील उमरदरी येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिडको येथील नृसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पहिली ते चौथीच्या एकूण ५२५ विद्यार्थ्यांना पत्रकार, पालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

१५ जून रोजी म्हणजेच शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील बालवाडी व पहिल्या वर्गातील नवागतांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच पहिली ते चौथ्या वर्गातील ५२५ विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

यावेळी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण देशमुख, कार्याध्यक्ष रमेश ठाकूर व सहकोषाध्यक्ष तिरूपती पाटील घोगरे यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक श्रीमती एकुंडवार व्ही. ए., श्रीमंती पोहरे व्ही. एन., श्रीमती वाडीकर पी. के., क्षीरसागर जी. बी., बस्वदे जी. टी., श्रीमती झाडे एल. बी., श्रीमती वाघमारे एम. व्ही., चौलवाड एम. बी., कोनापुरे डी .व्ही., वडजे जी. बी., जोगदंड जे. डी., जाधव जी. डी., सह शिक्षक सिंगनवाड व्ही. व्ही. यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# गोदावरी मनार पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पेढे देऊन उत्साहात स्वागत



**शंकरनगर (प्रतिनिधी)**– नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी गोदावरी मनार पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्राचार्य दुर्गाप्रसाद पांडे यांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व पेढे देऊन शुभेच्छा दिल्या.

नवीन दप्तर, आकर्षक गणवेश आणि चेहऱ्यावर आनंदाचे भाव घेऊन विद्यार्थी शाळेत दाखल झाले. अनेक दिवसांच्या सुट्टीनंतर एकमेकांना भेटण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत नियमित उपस्थिती, अभ्यासातील सातत्य, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून शाळा सुरू होण्याची आतुरतेने वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. पालकांनीही मुलांना वेळेत शाळेत पाठवून नवीन शैक्षणिक वर्षाची सकारात्मक सुरुवात केली.

# ग्रामीण टेस्टिंग लॅबोरेटरीला एनएबीएल मानांकन; गुणवत्ता, अचूकता आणि विश्वासार्हतेची राष्ट्रीय मोहोर

**नांदेड (प्रतिनिधी)** –ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड येथील ग्रामीण टेस्टिंग लॅबोरेटरीने राष्ट्रीय स्तरावर मानाचा तुरा रोवला आहे. तिला प्रतिष्ठित एनएबीएल मानांकन प्राप्त झाले आहे. स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील बांधकाम साहित्याची गुणवत्ता तपासणी, परीक्षण व प्रमाणीकरणासाठी उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक प्रयोगशाळेच्या कार्यक्षमतेला, गुणवत्ता, व्यवस्थापन प्रणालीला आणि तांत्रिक सक्षमतेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. या मानांकनामुळे नांदेडसह संपूर्ण मराठवाड्याच्या शैक्षणिक, संशोधनात्मक आणि औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

ग्रामीण टेस्टिंग लॅबोरेटरीमध्ये उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक परीक्षण यंत्रणा, मशिनरी व संसाधने, अचूक चाचणी प्रक्रिया, प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळ, गुणवत्ता नियंत्रण प्रणाली आणि राष्ट्रीय मानकांनुसार कार्यपद्धती यांचे नुकतेच तज्ज्ञ समितीकडून सखोल परीक्षण करण्यात आले होते. प्रयोगशाळेतील प्रत्येक प्रक्रिया, नोंदवही व्यवस्थापन, उपकरणांची अचूकता, चाचण्यांची विश्वासार्हता आणि गुणवत्ता निकषांचे पालन यांची काटेकोर तपासणी केल्यानंतर या प्रयोगशाळेला एनएबीएलचे मानांकन बहाल करण्यात आले आहे. हे मानांकन म्हणजे प्रयोगशाळेच्या उत्कृष्ट कार्याचा आणि गुणवत्तेच्या बांधिलकीचा राष्ट्रीय स्तरावरील गौरव मानला जातो. ग्रामीण टेस्टिंग लॅबोरेटरीला आयएसओ/आयईसी १७०२५:२०१७ या राष्ट्रीय दर्जाच्या मानकांनुसार मान्यता प्राप्त झाली असून, गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीच्या विश्वासार्हतेचा हा सर्वोच्च निकष मानला जातो.

सिमेंट, कॉंक्रीट, स्टील, विटा, गिट्टी, डांबर, मुरूम तसेच इतर बांधकाम साहित्यांच्या गुणवत्तेचे वैज्ञानिक परीक्षण करून त्यांचे गुणवत्ता प्रमाणीकरण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या प्रयोगशाळेत होणार आहे. अशा चाचण्यांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे वेळ, खर्च आणि संसाधनांची मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे. परिणामी मराठवाड्यातील औद्योगिक आणि पायाभूत विकास प्रकल्पांना गती मिळण्यास मदत होणार आहे.

एनएबीएल मानांकनाचा सर्वाधिक लाभ संस्थेतील विद्यार्थ्यांनाही होणार आहे. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळेत प्रत्यक्ष प्रशिक्षण, औद्योगिक चाचणी प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण प्रणाली आणि संशोधनाधारित शिक्षणाचा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे त्यांचे तांत्रिक कौशल्य अधिक विकसित होऊन उद्योगक्षेत्रातील रोजगारक्षमतेत वाढ होणार आहे. तसेच संशोधनवृत्तीला चालना मिळून नवोन्मेषी विचारसरणी विकसित होण्यास मदत होईल. हे मानांकन प्राप्त करण्यासाठी अभियांत्रिकी विभागाचे प्राचार्य डॉ. प्रभुलिंग उल्लागड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापत्य पदवी विभागाचे विभागप्रमुख प्रा. झाकेर उल्ला खान यांनी विशेष परिश्रम घेतले असून प्रयोगशाळेच्या संपूर्ण तांत्रिक व प्रशासकीय टीमचे योगदान मोलाचे ठरले आहे.

# नांदेड तालुक्यात आपले सरकार सेतू चालक यांची बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– महसूल विभागामार्फत देण्यात येणारे दाखले व इतर सेवा शासनाच्या विविध योजनां-बाबत शासन निर्णयानुसार व सेवांच्या प्रक्रियेचे सुलभीकरण Goverance Process Re-engineering (GPR), अंतर्गत कार्यवाही राबविणे व सुलभता आणणे बाबत नांदेड तालुक्यातील आपले सरकार सेतू चालक व ग्रामपंचायत तसेच प्रमाणपत्र संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची संयुक्त बैठक तहसील कार्यालय नांदेड येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत नांदेडचे उप-विभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसीलदार नांदेड संजय वारकड यांनी GPR अनुषंगाने शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्यात यावी व सेतू केंद्रांत दर्शनी भागात भाव फलक लावणे, ग्रामपंचायत सेतू केंद्रातून महसूलचे विविध दाखले सेवा देणे, अर्जदार यांना प्रमाणपत्र मुदतीत वितरण करणे अशा सुचना दिल्या.

यावेळी नायब तहसीलदार सुनिल माचेवाड, स्वप्नील दिगलवार, आपले सरकार सेतू जिल्हा समन्वयक केदार चोपडे व तालूक्यातील आपले सरकार सेतू चालक आदी उपस्थित होते.

# सिडकोतील इंदिरा गांधी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व नवगतांचे स्वागत



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– शारदा भवन शिक्षण संस्था संचालित इंदिरा गांधी हायस्कूल सिडको येथील शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच पहिली ते सातवी वर्गातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. यावेळी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१५ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेच्या प्रांगणात रांगोळी काढून व नवागत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तर पहिली ते सातवी वर्गातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

यावेळी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण देशमुख, कार्याध्यक्ष रमेश ठाकूर, तिरूपती पाटील घोगरे यांच्यासह शाळेतील प्राथमिकच्या मुख्याध्यापिका आशाताई शिंदे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका वैशाली देशमुख यांच्यासह पालकांची उपस्थिती होती.

यावेळी पालकांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी पहिली ते सातवी वर्गातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पडोळे यांनी केले. पर्यवेक्षक रमेश सज्जन, ग्रंथपाल राजेश वाघमारे, उपमुख्याध्यापक के. एस. माझाळकर, शिक्षक व्यंकट कल्याणकर, बालाजी मोटरगे, मारोती कदम, अनुसया चिलकेवार, दिलीप कदम, वैशाली पडोळे, प्रशांत धानोरकर, रंजना हिप्परगेकर, अश्विनी आकमवाड, आलीया सय्यद, विलास नरवाडे, धोंडीराज पवार, अमर बयास, एस. चालीकवार यांची उपस्थिती होती. पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाल्याचे चित्र दिसून आले.

# सावित्रीताई शेवाळकर पुरस्काराने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)**– सत्यशोधक विचार मंच आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार युनियनच्या संयुक्त विद्यमाने २१ वे साहित्य संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड येथे रविवारी पार पडला. या कार्यक्रमात देगलूर तालुक्यातील सुजायतपूर या गावातील अंगणवाडी सेविका, लेखिका, कवयित्री, गीतकार तथा सामाजिक कार्यकर्त्या सावित्रीताई शेवाळकर यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या अंजलीताई आंबेडकर, खा. रविंद्र चव्हाण, सुप्रसिद्ध कवी साहित्यिक संजय आवटे, अॅड. गोरक्ष लोखंडे, नितीन चंदनशिवे, प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, नगरसेवक प्रशांत इंगोले, फारूक अहेमद आदी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीताई शेवाळकर यांचा तसेच इतर मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास मुख्य संयोजक गणेश शिंगे, स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, निमंत्रक जी. पी. मिसाळे, संयोजक लालबाजी घाटे, मुख्य सल्लागार अॅड. विजय गोणारकर, संयोजन समितीचे अध्यक्ष उन्मेश ढवळे, सत्यशोधक विचारमंचचे अध्यक्ष कोंडदेव हाटकर, कार्याध्यक्ष मारोती कदम, सचिव राहुल गवारे, उपाध्यक्ष राज गोडबोले, सहकार्याध्यक्ष एन. टी. पंडित यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# अर्धापूर शहरातील नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडवा –नगराध्यक्षा सौ. वैशाली देशमुख



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्षा सौ. वैशाली प्रवीण देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारी व पदाधिकारी यांची आढावा बैठक सोमवार, दि. १५ जून रोजी पार पडली.

अर्धापूर नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्षा वैशाली देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी नगरसेवक, नगरसेविका व अधिकारी यांच्या उपस्थितीत शहरातील विविध भागांतील नाल्यांची स्वच्छता, नियमित कचरा संकलन, विविध प्रभागांतील पाणीपुरवठा व्यवस्था व अलीकडील वादळी वाऱ्यांमुळे निर्माण झालेल्या वीज पुरवठा व पथदिव्यांच्या समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून त्वरित समस्या सोडविण्याचे अधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधींनी आदेश दिले. संबंधित विभागांनी नागरिकांच्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी जगदीश दळवी, महावितरणचे उपविभागीय अभियंता पंकज देशमुख, अभियंता राठोड, नगरपंचायत स्वच्छता विभागाचे कैलास गायकवाड, बांधकाम विभागाचे अभियंता संदीप वानखेडे, शरद चापके व पाणीपुरवठा विभागातील सर्व कर्मचारी, विविध विभागांचे विभागप्रमुख, कर्मचारी आणि नगरसेवक उपस्थित होते.

बैठकीदरम्यान शहरातील नागरिकांच्या समस्या आणि विविध विभागांमधील समन्वय यावरही चर्चा करण्यात आली. नगराध्यक्षा सौ. वैशाली देशमुख यांनी सर्व विभागांनी जबाबदारीने काम करून नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले. तसेच स्वच्छता, पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत कोणतीही तक्रार प्रलंबित राहू नये, यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

## झोपणे अन् बसण्यामुळे कशी होते पाठदुखी... वाईट सवयी ठरतात कारण





**जाणूनबुजून किंवा नकळतपणे, आपण आपल्या दैनंदिन जीवनात अनेक वाईट सवयींचा समावेश करतो, ज्या कालांतराने मोठ्या समस्या बनू शकतात. आपल्या झोपण्याच्या आणि कामाच्या सवयी, बसण्याची चुकीची पद्धत आणि चुकीच्या पद्धतीने वजन उचलणे यांचा पाठ आणि मणक्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. सुरुवातीला, ही वेदना आपोआप बरी होते, परंतु कालांतराने, त्याचा तुमच्या दैनंदिन कामावर परिणाम होऊ लागतो. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, वाईट दैनंदिन सवयींमुळे मणक्यातील चकत्यांवर (डिस्क) आणि सांध्यांवर दाब येऊ शकतो. यामुळे पाठ आखडणे, नसा दुखणे आणि स्नायूंमध्ये ताण येऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये, ही वेदना इतकी तीव्र होऊ शकते की उभे राहणे, बसणे किंवा चालणे देखील कठीण होऊ शकते. अशा परिस्थितीत, तुम्ही या सवयी लवकर ओळखून त्या त्वरित बदलल्या पाहिजेत.**

### कोणत्या दैनंदिन सवयींमुळे पाठदुखी होऊ शकते?

- दीर्घकाळ एकाच स्थितीत बसणे : आपला मणका शरीराला हालचाल करण्यास मदत करतो. शरीराला पुढे, मागे, वर आणि खाली सहजपणे हालचाल करता यावी, यासाठी त्याची रचना केलेली आहे. तथापि, जेव्हा तुम्ही तासनतास एकाच स्थितीत बसता, तेव्हा त्यावर स्थिर भार (static load) निर्माण होतो. तुम्ही ऑफिसच्या आरामदायी खुर्चीत बसला असलात तरी, या स्थिर भारामुळे मणक्यांमधील चकत्या (intervertebral discs) दाबल्या जातात, ज्यामुळे मणक्याला लवचिक ठेवणारे द्रव (fluid) देखील दाबले जाते. कालांतराने, या चकत्या त्यांची आधार देण्याची क्षमता गमावतात, ज्यामुळे पाठदुखी सुरू होते.
- स्मार्टफोनचा गैरवापर : आजकाल, लहान-मोठे सर्व वयोगटातील लोकांना त्यांच्या स्मार्टफोनवर तासनतास घालवायला आवडते. तुम्ही आजूबाजूला पाहिल्यास तुमच्या लक्षात येईल की बहुतेक लोक मान खाली वाकवून मोबाईल फोनवर काम करत असतात. जेव्हा तुम्ही मोबाईल फोन पाहण्यासाठी तुमची मान ६० अंशांपर्यंत वर वाकवता, तेव्हा मानेच्या मणक्यावरील (cervical spine) प्रभावी भार अंदाजे २७ किलोग्रॅमने वाढतो. जेव्हा हा ताण खाली पसरतो, तेव्हा तुमच्या पाठीचा संपूर्ण मधला भाग विस्थापित होतो, ज्यामुळे पाठदुखी सुरू होते.
- चुकीच्या पलंगावर झोपणे : जेव्हा तुम्ही रात्री झोपण्यासाठी मऊ गादी निवडता, तेव्हा तुम्ही नकळतपणे तुमच्या मणक्यावर विपरीत परिणाम करत असता. मऊ गादीवर झोपल्याने तुमच्या ओटीपोटाच्या भागावर दाब वाढतो, ज्यामुळे सकाळी ताठरपणा येऊ शकतो.
- सतत पाण्याची कमतरता : मणक्यातील चकत्या (डिस्क) ८०% पेक्षा जास्त पाण्याने बनलेल्या असतात. गुरुत्वाकर्षणामुळे दिवसभर त्यातील पाणी कमी होते. जर तुम्ही पुरेसे पाणी प्यायले नाही, तर तुमचे शरीर रात्री या चकत्या पुन्हा फुगवू शकत नाही. यामुळे चकत्या पातळ होतात, ज्यामुळे मणक्याला जोडलेल्या नसांवर दाब येण्याचा धोका वाढतो.
- मणक्याकडे दुर्लक्ष करणे : मणका निरोगी ठेवण्यासाठी, मणक्याभोवती असलेले स्थिर करणारे स्नायू सक्रिय ठेवणे महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही दीर्घकाळ तुमच्या पाठीला ताण देत नाही, तेव्हा हे स्नायू निष्क्रिय होऊ शकतात. यामुळे तुमच्या शरीराच्या वजनाचा भार कमी होऊ शकतो.
- अयोग्य पद्धतीने वजन उचलणे : अलीकडच्या काळात जिममध्ये जाण्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र, लवकर शरीरयष्टी घडवण्याच्या प्रयत्नात, तरुण अनेकदा त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त वजन उचलतात. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, जिममध्ये असो वा ऑफिसमध्ये, सातत्याने चुकीच्या पद्धतीने वजन उचलल्याने पाठीवर दाब येतो. वजन उचलताना पाठ वाकवल्याने L4 ते L5 डिस्कवर अतिरिक्त दाब येतो, ज्यामुळे पाठदुखी होऊ शकते.
- बूट आणि मणका यांचा संबंध : तुमचे पाय तुमच्या संपूर्ण शरीरासाठी शॉक ॲबसॉर्बरचे काम करतात. सपाट, आधार न देणारे सँडल किंवा उंच टाचांचे बूट घातल्याने तुमच्या चालण्याची पद्धत बदलते आणि तुमच्या शरीराचे गुरुत्वमध्य बदलते. यामुळे तुम्हाला सरळ उभे ठेवण्यासाठी तुमच्या पाठीच्या खालच्या भागातील स्नायूंना जास्त मेहनत करावी लागते, ज्यामुळे सतत स्नायूंचा थकवा आणि पेटके येतात.

### मणक्यावरील दाब आणि वेदना कशा टाळाव्यात?

- भरपूर पाणी प्या.
- कामाच्या ठिकाणी असो वा घरी, तासनतास एकाच स्थितीत बसणे टाळा.
- मोबाईल फोन वापरताना तुमची पाठ सरळ ठेवा आणि काही मिनिटांनंतर पाठीला ताण द्या.
- झोपण्यासाठी खूप मऊ गादी वापरू नका.
- जिममध्ये, ऑफिसमध्ये किंवा घरी वजन उचलताना तुमच्या पाठीच्या कण्यावर दाब देऊ नका.
- घट्ट बसणारे आणि मऊ बूट घाला; उंच टाचेच्या सँडल किंवा बुटांमध्ये जास्त वेळ उभे राहिल्यानेही पाठदुखी होऊ शकते.
- संपूर्ण आरोग्यासाठी तुम्ही तुमच्या पाठीच्या कण्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. तुमच्या पाठीच्या कण्यावर दाब आणणाऱ्या सवयी शक्य तितक्या लवकर बदला. जर तुम्हाला बऱ्याच काळापासून पाठदुखीचा त्रास होत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.



## डोळ्यांच्या ताणाकडे दुर्लक्ष करणे पडू शकते महागात!

### 5 आयुर्वेदिक घरगुती उपाय देतील आराम...

**आजकाल डोळ्यांचा ताण (आय स्ट्रेन) समस्या कॉमन झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवणे. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत प्रत्येकजण डोळ्यांच्या ताणाने त्रस्त आहे. यामुळे डोळ्यांत वेदना, जळजळ किंवा थकवा, अंधुक दृष्टी, डोकेदुखी आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण येऊ शकते. या समस्येवर वेळीच उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. तुम्ही आयुर्वेदिक उपायदेखील वापरून पाहू शकता. आयुर्वेदात डोळ्यांचा ताण कमी करणारे अनेक प्रभावी उपचार आहेत. असे पाच उपाय जाणून घेऊया...**

### डोळ्यांचा ताण कमी करण्यासाठी आयुर्वेदिक उपाय

**आयुर्वेदात डोळ्यांना शरीरातील सर्वात महत्त्वाच्या आणि नाजूक अवयवांपैकी एक मानले जाते आणि त्यांच्या काळजीसाठी अनेक पारंपरिक उपाय सुचवले आहेत...**

- त्राटक : ही एक प्राचीन योगिक मेडिटेशन आणि शुद्धी क्रिया पद्धत आहे. यात दररोज काही मिनिटे एका अंधाऱ्या, शांत खोलीत डोळ्यांच्या पातळीवर ठेवलेल्या दिव्याच्या ज्योतीकडे हळूवारपणे टक लावून पाहिले जाते. यामुळे डोळ्यांचे स्नायू मजबूत होतात, एकाग्रता सुधारते आणि डोळे खोलवर स्वच्छ होतात.
- नेत्र तर्पण : नेत्र तर्पण डोळ्यांच्या ताणासाठी देखील फायदेशीर आहे. हा एक विशेष आयुर्वेदिक उपचार आहे, ज्यामध्ये डोळ्यांभोवती पिठाचा बांध तयार केला जातो आणि कोमट औषधी तूप एका निर्धारित कालावधीसाठी लावले जाते. यामुळे डोळ्यांच्या ऊतींचे खोलवर पोषण होते, कोरडेपणा कमी होतो आणि दृष्टी सुधारते.
- तूप किंवा त्रिफळा घृत : तिसरा उपाय म्हणजे झोपण्यापूर्वी डोळ्यांच्या थेंबांच्या स्वरूपात शुद्ध गाईचे तूप किंवा त्रिफळा घृत वापरणे. यामुळे डोळ्यांना ओलावा मिळतो आणि थकलेल्या डोळ्यांना आराम मिळतो.



- त्रिफळा आय वॉश : डोळ्यांचा थकवा कमी करण्यासाठी त्रिफळा आय वॉश हा देखील एक अत्यंत प्रभावी उपाय आहे. ते तयार करण्यासाठी, त्रिफळा वनस्पतींचे मिश्रण रात्रभर स्वच्छ पाण्यात भिजवून ठेवा, नंतर सकाळी ते गाळून घ्या आणि डोळे धुण्यासाठी वापरा. त्रिफळामध्ये नैसर्गिक दाहक-विरोधी गुणधर्म आहेत जे डोळ्यांची लालसरपणा आणि थकवा कमी करण्यास मदत करतात.
- गुलाबजल : गुलाबजल देखील डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. आयुर्वेदिक औषधशास्त्रानुसार, गुलाबजल थंड आणि सुखदायक मानले जाते. स्क्रीन वापरल्यानंतर दहा ते पंधरा मिनिटे थंड गुलाबजलात भिजवलेला कापसाचा बोळा मिटलेल्या डोळ्यांवर ठेवल्याने डोळ्यांची जळजळ लक्षणीयरीत्या कमी होते, ताण कमी होतो आणि थकलेले डोळे ताजेतवाने होतात.

### स्क्रीन टाइम वाढल्याने डोळ्यांवर परिणाम

आजकाल सर्व वयोगटातील लोक तासनतास फोन पाहत आहेत. शिवाय, नोकरीमुळे स्क्रीन टाइममध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. याचा तुमच्या डोळ्यांच्या आरोग्यावर थेट परिणाम होत आहे. कारण आपले डोळे सतत, तेजस्वी स्क्रीनकडे जास्त वेळ पाहण्यासाठी बनलेले नाहीत. त्यामुळे जेव्हा आपण स्क्रीनवर लक्ष केंद्रित करतो, तेव्हा पापण्यांची उघडझाप लक्षणीयरीत्या कमी होते. यामुळे डोळ्यांचा पृष्ठभाग ओलसर ठेवणारा अश्रूंचा थर तयार होण्यास अडथळा येतो. ज्यामुळे कोरडेपणा, जळजळ आणि लालसरपणा येतो. शिवाय, सतत स्क्रीन टाइममुळे तुमच्या डोळ्यांना इतरही अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. उदाहरणार्थ, स्क्रीनवर सतत बदलणारे व्हिडिओ पाहिल्याने डोळ्यांना वारंवार लक्ष केंद्रित करावे लागते. यामुळे सिलिअरी स्नायूंवर (जे लेन्सची फेक्सिबिलिटी ठरवतात) दाब वाढतो. सतत असे होत राहिले तर दूरच्या वस्तूंवर लक्ष केंद्रित करण्यास अडचण येऊ शकते. जर डोळ्यांच्या ताणाकडे दुर्लक्ष केले गेले, तर त्यामुळे मायोपिया आजार होऊ शकतो, विशेषतः मुलांमध्ये आणि तरुण प्रौढांमध्ये.

## रक्तदान करण्याचा विचार करताय?

**रक्तदान हे केवळ एक दान नाही, तर ते कोणाच्या तरी आयुष्यासाठी एक नवी आशा आहे. अलीकडेच १४ जूनला जागतिक रक्तदाता दिन साजरा करण्यात आला. या दिवसाचा उद्देश रक्तदानाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा आहे. पण सत्य हे आहे की, प्रत्येकजण रक्तदान करू शकत नाही. अमेरिकन रेड क्रॉस आणि विविध संशोधनानुसार काही परिस्थितीत रक्तदान करता येत नाही...**

- सर्दी आणि ताप : सर्दी आणि ताप असलेले लोक रक्तदान करू शकत नाहीत. सर्दी किंवा ताप उतरल्यास आणि कोणतीही लक्षणे दिसत नसल्यास ते तीन दिवसांनंतर रक्त दान करू शकतात.
- टॅटू आणि पिअर्सिंग : ज्या लोकांनी टॅटू किंवा स्किन पिअर्सिंग केले आहे, ते पिअर्सिंगनंतर तीन महिन्यांपर्यंत रक्तदान करू शकत नाहीत. असे मानले जाते की टॅटू आणि पिअर्सिंग पार्लरला वैद्यकीय परवाना नसतो. त्यामुळे तीन महिन्यांनंतरच रक्तदान करण्याची शिफारस केली जाते.
- गर्भधारणा, गर्भपात किंवा मिसकॅरेज झाल्यानंतर महिला सहा आठवड्यांपर्यंत (दीड महिना) रक्त दान करू शकत नाहीत. या काळात रक्तस्त्राव आणि लोहाच्या कमतरतेचा धोका असतो. त्यामुळे सहा आठवड्यांनंतर डॉक्टरांकडून परवानगी घेऊनच रक्तदान करावे.
- प्रवास : जर तुम्ही डेंग्यू, झिका विषाणू किंवा इतर कोणत्याही संसर्गाचा जास्त प्रादुर्भाव असलेल्या भागात प्रवास केला असेल, तर तुम्ही रक्त दान करू नये. आरोग्य तज्ज्ञाकडून संपूर्ण शारीरिक तपासणी केल्यानंतरच रक्तदान करण्याची शिफारस केली जाते.
- व्हायरल हिपॅटायटीस, एचआयव्ही किंवा एसटीडीने संक्रमित व्यक्ती रक्तदानासाठी पात्र नसतात.

### कोणत्या परिस्थितींमध्ये रक्तदान टाळावे?

एनसीबीआय (NCBI) नुसार, एचआयव्ही किंवा एड्स असलेल्या लोकांना रक्तदान करण्याची परवानगी नाही. याव्यतिरिक्त, हिमोफिलिया, हिपॅटायटीस बी किंवा हिपॅटायटीस सी असलेले रुग्ण आणि काही विशिष्ट कर्करोगाचे रुग्ण यांना रक्तदान करण्याची परवानगी नाही. याचे कारण असे की, या रुग्णांच्या रक्तात असे संसर्ग असतात जे इतरांना संक्रमित होऊ शकतात.

### रक्त कधी दान करू शकता?

- जर तुम्ही रक्तदान करण्याचा विचार करत असाल, तर काही गोष्टी लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार (WHO), निरोगी व्यक्ती रक्त दान करू शकतात, परंतु त्यांनी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत :
- रक्तदात्याचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त आणि ६५ वर्षांपेक्षा कमी असावे.
- शरीराचे वजन ५० किलोपेक्षा कमी नसावे.
- महिलांसाठी हिमोग्लोबिनची पातळी १२.० ग्रॅम/डीएल आणि पुरुषांसाठी १३.० ग्रॅम/डीएल पेक्षा कमी नसावी.
- रक्तदात्याचा रक्तदाब आणि नाडी सामान्य असावी.
- शरीर पूर्णपणे तंदुरुस्त असावे.

### रक्तदान केले असेल तर...

दररोज २ ते ३ लिटर पाणी प्या. आरोग्यदायी आहार घ्या. जड किंवा दीर्घकाळ चालणारा व्यायाम टाळा. पुरेशी विश्रांती घ्या. रक्तदान केल्यानंतर आपल्या आरोग्याची काळजी घेणे लक्षात ठेवा. अमेरिकन रेड क्रॉसच्या संशोधन अहवालानुसार, असे केल्याने तुम्ही केवळ एकदाच नाही, तर दर तीन महिन्यांनी रक्तदान करू शकता. रक्तदान करण्यापूर्वी किंवा नंतर तुम्हाला काही अस्वस्थता जाणवल्यास विलंब न करता लवकरात लवकर डॉक्टरांशी संपर्क साधा.

## स्वच्छ, डागविरहित पिवळे आंबे नका घेऊ...

### विषारी रसायनांनी पिकवलेले आंबे ओळखण्याचे 5 सोपे मार्ग FSSAI ने सांगितले...

आंब्याला फळांचा राजा असे उगाच म्हटले जात नाही. त्याचा हंगाम असेपर्यंत, प्रत्येकजण त्याची आतुरतेने वाट पाहतो आणि मग पुढच्या हंगामाची वाट पाहतो. हे पिवळे आणि गोड फळ खाणे हा एक अनोखा अनुभव असतो. पण पूर्णपणे पिवळा, चमकदार आंबा विकत घेण्याची चूक कधीही करू नका, कारण तो विषारी रसायनांनी पिकवलेला असण्याची दाट शक्यता असते. असा आंबा विकत घेणे आणि खाणे म्हणजे स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (FSSAI) रासायनिकरित्या पिकवलेले आणि नैसर्गिकरित्या पिकवलेले आंबे यांच्यातील पाच फरक वैशिष्ट्ये सांगितली आहेत. आहेत. हे लक्षात ठेवून, तुम्ही खरेदी करताना तुमच्या शरीरासाठी आणि आरोग्यासाठी आरोग्यदायी फळे निवडू शकता. तुम्हाला या रसायनाचे परिणाम आणि या रोगांच्या संभाव्य धोक्यांबद्दलही माहिती मिळेल. कॅल्शियम कार्बाइड एक विषारी रसायन : काही लोक आंब्यांचा पुरवठा वाढवण्यासाठी हंगामाच्या सुरुवातीलाच आंबे काढतात आणि नंतर ते रासायनिकरित्या पिकवून बाजारात विकतात. FSSAI च्या मते, आंबे लवकर पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइड पावडरचा वापर केला जातो. हे रसायन धोकादायक ॲसिटिलीन वायू बाहेर टाकते. अनेक अभ्यासांनुसार हे रसायन मानवी शरीरासाठी विषारी मानले जाते.

### कृत्रिम आणि नैसर्गिकरित्या पिकवलेल्या आंब्यांतील फरक

- संपूर्ण आंब्याला एकसारखा चमकदार पिवळा रंग
- नैसर्गिक सुगंध नसणे
- बाहेरून मऊ आणि आतून कडक
- चव नसणे किंवा विचित्र चव
- आंब्यावर पांढऱ्या पावडरचे कण



### नैसर्गिकरित्या पिकलेल्या आंब्यांची 5 चिन्हे

- विविध किंवा विचित्र रंग, अनेकदा हिरव्या आणि पिवळ्या रंगाचे ठिपके
- देठाजवळ गोड वास
- दाबल्यावर किंचित मऊ लागणे
- उत्तम आणि रसरशीत चव
- आंब्यावर नैसर्गिक काळे डाग

### कॅल्शियम कार्बाइड धोकादायक का आहे?

एनसीबीआय (NCBI) वरील संशोधनानुसार, फळे पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइड पावडरसह विषारी रसायने वापरली जातात. त्यात आर्सेनिक आणि इतर विषारी व कर्करोगजन्य रसायनांची भेसळ असते. याशिवाय, फळांवर संरक्षक, मेणयुक्त पदार्थ, आहार आणि स्वाद वाढवणारे पदार्थ देखील वापरले जातात, ज्यामुळे कर्करोग, मधुमेह आणि थायरॉईडचे विकार होऊ शकतात.

# पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांचा लातूरमधील तक्रारदारांशी 'संवाद'



**नांदेड(प्रतिनिधी)**–नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस - नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना थेट पोलीस उपमहानिरीक्षक यांच्यासमोर आपली व्यथा मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उपमहानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे. गत महिन्यात लातूर, हिंगोली, परभणी व नांदेड या जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आपल्या तक्रारी पोलीस उपमहानिरीक्षक यांच्यासमोर मांडल्या होत्या.

मंगळवार, दि. १६ जून रोजी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक लातूर कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर दुपारी ३ ते ६.३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान एकूण ७३ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांच्याकडे सोपविले. यात मालमत्ताविषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

सदर दिवशी प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात आले आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

# मराठवाड्यात पावसाची संमिश्र स्थिती

**लातूर (प्रतिनिधी)** – यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मराठवाडा विभागात अतिशय संमिश्र चित्र पाहायला मिळत आहे. संपूर्ण छत्रपती संभाजीनगर विभागात जून महिन्यासाठी सरासरी ७१.५ मिमी पाऊस अपेक्षित असतो, मात्र प्रत्यक्षात केवळ ४०.७ मिमी (५६.९ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. संपूर्ण पावसाळी हंगामाच्या (जून ते सप्टेंबर) ६७९.५ मिमी सरासरीचा विचार करता, आतापर्यंत केवळ सहा टक्के पाऊस पडला आहे.

धाराशिव जिल्ह्याला पावसाचा सर्वाधिक दिलासा मिळाला आहे. धाराशिवमध्ये सरासरी ६७.७ मिमी पैकी ७६.३ मिमी (११२.७ टक्के) पाऊस बरसला आहे. बीड जिल्ह्यातही पावसाने चांगली हजेरी लावली. तिथे ६८.५ मिमी सरासरीच्या तुलनेत ५३.४ मिमी (७८ टक्के) पावसाची नोंद झाली. उर्वरित जिल्ह्यांमध्ये मात्र पाऊस मध्यम स्वरूपाचा आहे.

लातूर जिल्ह्यात ४४.९ मिमी (६२.२ टक्के), नांदेडमध्ये ४९.० मिमी (५९.१ टक्के), हिंगोलीत ४३.८ मिमी (४८.६ टक्के) आणि परभणीत ३६.३ मिमी (४६.८ टक्के) पाऊस झाला आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना या दोन जिल्ह्यांत पावसाने मोठी दडी मारली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वात कमी म्हणजे अवघा १३.२ मिमी (१९.८ टक्के) आणि जालना जिल्ह्यात १९.२ मिमी (२७.२ टक्के) पाऊस झाला आहे.

### हवामान अंदाज आणि इशारा

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईच्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवसांत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता आहे. १७ जून रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि नांदेड जिल्ह्यात सायंकाळी वादळी वाऱ्यासह हलका पाऊस होऊ शकतो.


## Change In Name

My Old Name is **Syed Makhdoom Syed Abdul Raheem** which now I am changing as New Name **Syed Makhdoom Syed Abdul Rahim** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address - **Syed Makhdoom Syed Abdul Rahim** 8670 Narangal Road Abubakar Colony Post-Degloor, Dist. Nanded-431717


# औषधांच्या नियमात बदल

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)** देशातील नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि धाडसी निर्णय घेतला आहे. आता देशभरातील फार्मसी किंवा औषधांच्या दुकानांतून खोकल्याची औषधे आणि इतर सिरप-आधारित औषधे थेट म्हणजेच 'ओव्हर-द-काउंटर' खरेदी करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. यापुढे अशी औषधे खरेदी करण्यासाठी नोंदणीकृत डॉक्टरांचे अधिकृत प्रिस्क्रिप्शन (चिठ्ठी) सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने 'ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स रूल्स, १९४५' मध्ये 'ड्रग्ज नियम, २०२६' (Drugs and Cosmetics Act, १९४०) अंतर्गत महत्त्वाचे बदल केले आहेत. या संदर्भातील अधिकृत अधिसूचना ९ जून २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या दुरुस्तीचा मुख्य भाग म्हणजे १९४५ च्या नियमावलीतील 'शेड्यूल के'मधील अनुक्रमांक १३ च्या आयटम (७) मधून 'सिरप' हा शब्द वगळण्यात आला आहे. या तांत्रिक बदलामुळे आता सर्व प्रकारच्या सिरप-आधारित औषधांच्या विक्रीवर सरकारचे कडक नियंत्रण असणार आहे.


कार्यालय

## जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड

जावक क्र. जीवअ/नांदेड/चौकशी-१/३२१/२०२६ दिनांक ९/६/२०२६

### जाहीर प्रगटन

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणे बाबत.

वक्फ संस्थेचे नाव-आशूरखाना मनियार गल्ली(टिनशेड) नांदेड ता. जि. नांदेड

उपरोक्त वक्त संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास नोंदणीकृत असून, अर्जदार शेख फतीम शेख लतीफ व इतर (४) लोकांनी या कार्यालयात योजना गठीत करण्यासाठी दि. १८/०५/२०२६ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केली आहे. प्रारूप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ (५) वर्षांचा असून, व्यवस्थापन समिती निवडीची रिक्त निवडणुकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | शेख फतीम शेख लतीफ | अध्यक्ष |
| २. | मोहम्मद रफीक मोहम्मद रिजवानउद्दीन | उपाध्यक्ष |
| ३. | मोहम्मद मुश्ताक शेख अहेमद | सचिव |
| ४. | मोहम्मद नूर काशीम शेख | सहसचिव |
| ५. | मोहम्मद समीउद्दीन मोहम्मद हफीजउद्दीन | कोषाध्यक्ष |
| ६. | मोहम्मद रफीक अब्दुल नबी | सदस्य |
| ७. | जाकेर अहेमद खलील अहेमद | सदस्य |
| ८. | शेख मकदुम शेख अहेमद | सदस्य |
| ९. | अब्दुल रशीद मोहम्मद सरवर | सदस्य |
| १०. | शमीम बेगम भ्र. शेख अहेमद | सदस्य |
| ११. | फातेमाबी भ्र. मोहम्मद रफीक | सदस्य |

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांना सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय नांदेड, पत्ता- मस्जिद जुनी ईदगाह नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे. विहित वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

मो. मोतासिम अन्सारी
जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड



शासन मान्य
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त सामाजिक न्याय विभाग समाज कल्याण आयुक्तालयातर्फे अनुदानीत वसतिगृह आनंदमयी सेवाश्रम कौठा (जुना) नांदेड द्वारा संचालित

## आनंदमयी हॉस्टेल्स कौठा (जुना) नांदेड, ता. जि. नांदेड

### मोफत प्रवेश देणे चालू आहे

सदरील शासन मान्य अनुदानीत मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू व होतकरू मागासवर्गीय मुलांना खालीलप्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा.भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| | एकूण | १०० टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीसी | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्ग ओपन | ५ टक्के |

वसतिगृहाची वैशिष्ट्ये-सुसज्ज इमारत, जेवणाची व राहण्याची उत्तम व्यवस्था, वसतिगहालगत शाळा, निसर्गरम्य वातावरण , स्वतंत्र अभ्यासिका, ग्रंथालयाची सुविधा शुभर टक्के निकालाची परंपरा, पिण्याच्या पाण्यासाठी अॅरो, अभ्यासाकडे विशेष लक्ष, सीसीटीव्ही उपलब्ध.

टिप-१. एकूण मान्य संख्येच्या २० टक्के १. इतर मागास प्रवर्ग, ओबीसी १५ टक्के, २. बिगर मागास प्रवर्ग ओपन ५ टक्के मुलांना प्रवेश दिला जाईल. २. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, कोडीच्या महामारीमध्ये मृत्यू पावलेल्या पालकांची अनाथ मुले, देशसेवा करताना शहीद/दिव्यांग झालेल्या जवानांची मुले. एकल मातांची मुले. परित्यक्त्या, देवदासी, गणिका तसेच इतर कारणाने समाजातील काही अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना विशेषत्त्वाने प्रवेश दिला जाईल.

सचिव
आनंदमयी हॉस्टेल्स
कौठा(जुना), ता. जि. नांदेड
मो. ९०२८११९३१२,

अधीक्षक
आनंदमयी हॉस्टेल्स
कौठा(जुना), ता. जि. नांदेड
मो. ८४५९३७३७३९



शासन मान्य
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त सामाजिक न्याय विभाग समाज कल्याण आयुक्तालयातर्फे अनुदानीत वसतिगृह शिक्षण विकास मंडळ नांदेड संचालित

## शिक्षण विकास मुलींचे वसतिगृह दरवेशनगर, नांदेड ता. जि. नांदेड

### प्रवेश देणे चालू आहे

सदरील शासन मान्य अनुदानीत मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थिनींना जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा.भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| | एकूण | १०० टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीसी | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्ग ओपन | ५ टक्के |

नोट-सुसज्ज इमारत, भोजनाची उत्तम सोय, ग्रंथालयाची सोय, वसतिगृहापासून जवळच अनेक शाळा, शंभर टक्के निकालाची परंपरा, अभ्यासाकडे विशेष लक्ष, पिण्यासाठी शुद्ध फिल्टरचे पाणी

टिप-एकूण मान्य संख्येच्या २० टक्के १. इतर मागास प्रवर्ग, ओबीसी १५ टक्के, २. बिगर मागास प्रवर्ग ओपन ५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

अध्यक्ष अधिक्षिका
शिक्षण विकास मुलींचे वसतिगृह दरवेशनगर, नांदेड, ता. जि. नांदेड
मो. ७३७८६६२८७१, ९३०९९१४४९७



शासन मान्य

## जगजीवनराम विद्यार्थी वसतिगृह मगनपुरा, नांदेड

### प्रवेश देणे चालू आहे

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात स्थानिक विद्यालयात शिकत असलेल्या इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात असलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे प्रवेश देणे चालू आहे. खालीलप्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | १४-६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | ३-१४ टक्के |
| ३ | वि.जा.भ.ज./व्ही.जे./एन.टी. | ३-१७ टक्के |
| ४ | इतर मागासवर्गीय | ३-१५ टक्के |
| ५ | ओपन खुला | १-७५ टक्के |
| | एकूण | २४-१०० टक्के |
| | | |

नोट-मोफत प्रवेश, सुसज्ज इमारत, तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्फत मुलांची प्रगती करून घेणे. भोजनाची उत्तम सोय, अंथरूण, पांघरूण, प्लेट, वाटी व पेटीची सोय. तरी पालकांनी त्वरित अर्ज करावा.

संचालक
जगजीवनराम विद्यार्थी वसतिगृह मगनपुरा, नांदेड
मो. ९९७५२७०७८१



आधार फाऊंडेशन नांदेड संचालित

## कुमार छात्रालय राहूल कॉलनी तरोडा ता. जि. नांदेड

### मोफत प्रवेश देणे चालू आहे

प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता चालू शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ साठी इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी जातीनिहाय टक्केवारीनुसार मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा.भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक(खुला) | ५ टक्के |
| | | |

नोट -भव्य व सुसज्ज इमारत, मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय, विच्छाण्याची सोय तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे अधीक्षकांचे विशेष लक्ष. तरी वरील संवर्गातील जातीच्या गरजू व होतकरू पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा.

सचिव
कुमार छात्रालय
राहूल कॉलनी तरोडा, ता. जि. नांदेड
मो. ९५४५५५७१११

संपर्क नं
७६६६०९१२७८
९५२७९६४१२९



आधार फाऊंडेशन नांदेड संचालित

## वैभव मैत्री मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह गणेशनगर, नांदेड, ता. जि. नांदेड

### मोफत प्रवेश देणे चालू आहे

प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता चालू शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ साठी इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी जातीनिहाय टक्केवारीनुसार मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा.भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक(खुला) | ५ टक्के |
| | | |

नोट -भव्य व सुसज्ज इमारत, मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय, विच्छाण्याची सोय तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे अधीक्षकांचे विशेष लक्ष. तरी वरील संवर्गातील जातीच्या गरजू व होतकरू पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा.

सचिव
वैभव मैत्री मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह
गणेशनगर, नांदेड, ता. जि. नांदेड
मो. ९५४५५५७१११

संपर्क नं
७६६६०९१२७८
९५२७९६४१२९



कै. गयाबाई एज्युकेशन सोसायटी एकदरा संचालित

## आदर्श विद्यार्थी वसतिगृह सांगवी ता. जि. नांदेड

### मोफत प्रवेश देणे चालू आहे

प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता चालू शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ साठी इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी जातीनिहाय टक्केवारीनुसार मोफत प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसूचित जमाती (एस.टी.) | १४ टक्के |
| ३ | वि.जा.भ.ज./व्ही.जे./एन.टी. | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक(खुला) | ५ टक्के |
| | | |

नोट -भव्य व सुसज्ज इमारत, मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय, विच्छाण्याची सोय तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे अधीक्षकांचे विशेष लक्ष. तरी वरील संवर्गातील जातीच्या गरजू व होतकरू पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा.

संपर्क नंबर
मो. ७६६६०९१२१८
मो. ९५२७९६४१२९

संचालक
आदर्श विद्यार्थी वसतिगृह सांगवी
ता. जि. नांदेड
मो. ७८८९१८४०७८



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## शेतकरी कर्जमाफीच्या 'जीआर'ची ठाकरे सेनेकडून होळी; सरसकट कर्जमाफी आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य सरकारने सातबारा कोरा करण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांची क्रूर थट्टा केली आहे. कर्जमाफीसाठीच्या अटी अत्यंत जाचक आहेत. त्यामुळे ही कर्जमाफी नसून कर्ज वसुली आहे, असा गंभीर आरोप करत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने मंगळवार, दि. १६ जून रोजी शासनाच्या जीआरची होळी करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या, अशी मागणी करण्यात आली आहे.



जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या आंदोलनात जिल्हाप्रमुख भुजंग पाटील डक, जिल्हा संघटक नरहरी वाघ, महानगरप्रमुख मनोज यादव, तालुकाप्रमुख सुनिल पाटील कदम, तालुकाप्रमुख पद्माकर पाटील सावंत, तालुकाप्रमुख नंदू पाटील वैद्य, विधानसभा प्रमुख विजय कल्याणकर, शहरप्रमुख जितुसिंग टाक, तालुका संघटक नवनाथ पाटील जोगदंड, उपतालुकाप्रमुख पुरभाजी जाधव पासदगावकर, युवासेना डॉ. सौरभ देवकत्ते, मारोतराव कदम, विठ्ठलराव कदम, ब्रिजलाल उगवे, गजानन देशमुख, प्रवीण देशमुख, व्यंकटी बाराटे, माधव पांचाळ, बाबासाहेब जोगदंड, बालाजी कल्याणकर, सुरेश पावडे, किशोर ठाकूर, भाया शर्मा, लालचंद यादव व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

राज्य सरकारने नुकतीच अनेक अटी व शर्ती घालून कर्जमाफीची घोषणा केली आहे. मात्र सदर अटी-शर्तींचा अभ्यास केला असता ही योजना प्रत्यक्षात कर्जमाफी योजना नसून कर्जवसुली योजना असल्याचे स्पष्टपणे दिसून येते, असा आरोपही आंदोलकांनी केला आहे. या योजनेमध्ये प्रामुख्याने सन २०१९ ते २०२५ या कालावधीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. यापूर्वी सन २००८ मधील केंद्र शासनाची कर्जमाफी, तसेच सन २०१७ व २०१९ मधील राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनांमधूनही राज्यातील अनेक पात्र शेतकरी वंचित राहिले आहेत. काही शेतकऱ्यांना तीन-तीन वेळा कर्जमाफीचा लाभ मिळाला, तर अनेक शेतकऱ्यांना एकदाही कर्जमाफीचा लाभ मिळू शकलेला नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे आंदोलकांनी म्हटले.

सद्यस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीमध्ये नियमित कर्जफेड करणारे शेतकरी असोत किंवा थकीत शेतकरी असोत, त्यांच्यावर विविध अटी व शर्ती लादण्यात आल्या आहेत. या अटी-शर्ती म्हणजे भीक नको, पण कुत्रं आवर अशा स्वरूपाच्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या काळात आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना प्रत्येक सभेमध्ये सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले होते, मात्र आजच्या घडीला हे आश्वासन पूर्णपणे विसरल्याचे चित्र दिसून येत असल्याचेही शिवसैनिकांनी म्हटले आहे.

## किनवटच्या प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालयाला हदगाव व हिमायतनगर तालुका जोडणे गैरसोयीचे –खा. आष्टीकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्य सरकारने राज्यात काही नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांना मंजुरी दिली असून, त्यात हिंगोली लोकसभा मतदारसंघातील किनवट तालुक्याचाही समावेश आहे. ही बाब स्वागतार्ह असली तरी किनवटला हदगाव व हिमायतनगर तालुका जोडणे ही बाब चुकीची असून, सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांना अतिशय अडचणीची ठरणार असल्याने तो प्रयोग जिल्हाधिकारी यांनी करू नये, असे पत्र खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी दिले आहे.



हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील जनता, सर्वसामान्य नागरिक, पत्रकार, व्यापारी संघटनेचे पदाधिकारी यांनी याबाबत तक्रार दिली आहे ती अतिशय योग्य आहे. २०१५ पूर्वी म्हणजे दोन तालुक्यांसाठी स्वतंत्र उपविभागीय अधिकारी कार्यालय होण्यापूर्वी हदगाव व हिमायतनगर हा भाग किनवटला जोडला होता. त्यावेळेस पण विविध प्रमाणपत्र, शेतीचे न्यायनिवाडे, अर्ध न्यायिक बाबींसाठी किनवट हे गैरसोयीचे असल्याने हदगावला उपविभागीय अधिकारी कार्यालय मंजूर झाले होते.

वास्तविक हदगाव ते किनवट हे अंतर जास्त आहे. या भागाला वाहन सेवा वेळेत नाही. आजही हदगाव ते किनवट सरळ वाहन सेवा उपलब्धता नाही. उलट सध्याचे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड हे ५५ किमीवर आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी इतर सर्व कार्यालये, जिल्हा न्यायालय, पोलीस अधीक्षक, पोलीस परिक्षेत्र कार्यालय, जिल्हा परिषद ही महत्वाची कार्यालये नांदेड येथे असल्याने किनवटला प्रस्तावित अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सर्वच बाजूने हदगाव, हिमायतनगरसाठी गैरसोयीचे आहे. तरी प्रस्तावित किनवट अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास हदगाव, हिमायतनगर हा भाग जोडण्यात येवू नये ही जनतेची मागणी असून या बाबत कार्यवाही करावी असे पत्र खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

## विकसित भारत बिल्डथॉनमध्ये चौफाळा शाळेच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची निवड

### कृत्रिम बुद्धिमत्ता स्पर्धेत जिल्हा परिषद शाळेची राष्ट्रीय स्तरावर झेप

**नांदेड (प्रतिनिधी)**– विकसित भारत बिल्डथॉन २०२५ या देशपातळीवरील नवसंशोधन स्पर्धेत निवड झालेल्या जिल्हा परिषद हायस्कूल चौफाळा येथील विद्यार्थ्यांनी मंगळवार, दि. १६ जून रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांची भेट घेऊन आपल्या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली.



यावेळी विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार केलेली मेघना कावली यांची फायबर-रेझिन प्रतिकृती त्यांना भेट म्हणून प्रदान केली.

शालेय स्तरावरील नव-संशोधकांचा शोध घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विकसित भारत बिल्डथॉन २०२५ या स्पर्धेत चौफाळा शाळेच्या स्मार्ट ब्रिज सेफ्टी अलार्म सिस्टीम या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची देशपातळीवर निवड झाली आहे. नांदेड जिल्ह्यातून सादर झालेल्या हजारो प्रस्तावांमधून निवड झालेल्या ९३२ कल्पना आणि प्रारूप नमुन्यांमध्ये या प्रकल्पाचा एकमेव समावेश आहे. या यशस्वी प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांच्या गटाला प्रत्येकी १० हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले असून, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.

## चैन स्नेचर आणि जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहर आणि परिसरात सोनसाखळी पळविणारी तसेच जबरी चोरी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली. वरिष्ठांचा आदेश मिळाल्यानंतर ऐन आपल्या वाढदिवसदिनी सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत या टोळीतील तीन सदस्यांना जेरबंद करून त्यांच्याकडून सव्वा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



जिल्ह्यातील गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत कारवाई करण्याबाबत सूचना स्थानिक गुन्हे शाखेसह जिल्हाभरातील ठाणेदारांना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी एपीआय रवी वाहुळे यांच्या पथकाला अलर्ट केले.

त्याअनुषंगाने सपोनि रवी वाहुळे व त्यांचे पथकातील अंमलदार पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत शेख अरबाज, मतीन व आरफात सय्यद हे चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी इदगाह जवळील वाजेगावकडे जाणाऱ्या पुलाजवळ येणार असल्याची माहिती मिळाली. त्यावरून मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी साफळा लावून मोटारसायकलवर आलेले ३ इसम सय्यद आरफात सय्यद हुसेन (वय २६ वर्षे, रा.मलनबाग बिल्डींग जवळ, देगलूर नाका, नांदेड), मोहम्मद मतीन ऊर्फ तंडी मोहम्मद मुजफ्फर (वय २८ वर्षे, रा. हबिबिया कॉलनी, दारूल ऊलुम जवळ, देगलूर नाका नांदेड) आणि शेख आरबाज शेख अजीज (वय २१ वर्ष, रा.नवी मस्जीद जवळ, हातई इतवारा, नांदेड) यांना ताब्यात घेवून त्यांच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपनीचे ५ मोबाईल व १ मोटारसायकल असा एकूण १ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## विद्यापीठामध्ये सात दिवसीय योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली सात दिवसीय योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर दि. १५ जून ते २१ जून या कालावधीत दररोज सकाळी ६.३० ते ८ या वेळेत विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर आयोजित करण्यात येत आहे.

या शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना योग प्रशिक्षणासोबतच दैनंदिन जीवनातील योगाचे महत्त्व, शारीरिक तंदुरुस्ती, योग्य आहार, निरोगी जीवनशैली आणि जीवन जगण्याची कला यासंबंधी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक कु. पूजा जमादार (पुणे) या शिबिरामध्ये प्रशिक्षण व मार्गदर्शन करणार आहेत.

विशेष म्हणजे या शिबिरासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. तसेच शिबिरासाठी कोणतीही वयोमर्यादा नसल्याने इच्छुकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## भरधाव मोटारसायकलच्या धडकेत वृद्ध इसमाचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरातील मुख्य रस्त्यावरील स्मशानभूमी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावर घडलेल्या दुर्दैवी अपघातात कै. विठ्ठल संभाजी पवार (वय ७०) यांचे उपचारादरम्यान निधन झाले. भरधाव वेगातील मोटारसायकलने दिलेल्या जोरदार धडकेत ते गंभीर जखमी झाले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, विठ्ठल संभाजी पवार हे रस्त्याने पायी जात असताना भरधाव मोटरसायकलने त्यांना जोराची धडक दिली. या धडकेनंतर ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने लोहा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना नांदेड येथील विष्णुपुरी जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

या घटनेमुळे पांगरी या गावावर शोककळा पसरली असून, भरधाव वाहनांमुळे वाढणाऱ्या अपघातांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.



**नांदेड** –राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांवर कोळी महासंघाच्यावतीने कोळी महादेव, मल्हार कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी व डोंगर कोळी या आदिवासी कोळी जमातीतील नागरिकांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याकरीता एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना निवेदन दिले. याप्रसंगी कोळी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष शंकर मनाळकर, शिवाजीराव गलांडे, राम मालेवाड, के. एन. जेटेवाड, रेजितवाड, पुंडलिक बोंडलेवाड, प्रल्हाद मद्देवाड, गणपतराव नरवाडे, माधव पुनवड, विजय प्रेमुलवाड, माधव बोईनवाड, अनिल गडमवाड आदी उपस्थित होते. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## सिंदखेड पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे विद्युत तारेला चिकटलेल्या शेतकऱ्याला जीवदान

**नांदेड (प्रतिनिधी)** –सिंदखेड पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे विद्युत शॉक लागून तारेस चिकटलेल्या एका शेतकऱ्याला जीवदान मिळाल्याची घटना मंगळवार, दि. १६ जून रोजी सकाळी घडली. पोलिसांनी दाखविलेल्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पोलीस स्टेशन सिंदखेड येथील सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे, सहायक पोलीस उपनिरीक्षक राठोड आणि पोलीस अंमलदार संदीप वानखेडे हे सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास नियमित पेट्रोलिंगसाठी वाई बाजारच्या दिशेने जात होते. यावेळी मनिरामथड येथील शेतशिवारात एका व्यक्तीला शेतातील पाण्याच्या मोटारीच्या विद्युत तारेचा शॉक लागून तो तारेला चिकटल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ सरकारी वाहन थांबविले. स्वतः च्या जीवाची पर्वा न करता जवळील झाडाच्या लाकडाचा वापर करून त्यांनी संबंधित व्यक्तीला विद्युत प्रवाहापासून सुरक्षितपणे दूर केले. पोलिसांच्या या प्रसंगावधानपूर्ण कृतीमुळे एका शेतकऱ्याचे प्राण वाचले. जखमी शेतकऱ्याचे नाव दीपक पेटकुळे (रा. करंजी) असे असून, त्यांना तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र, सिंदखेड येथे दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे पोलीस दलाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## 'स्वारातीम' विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या स्टार्टअपला भारत सरकारची मान्यता

### 'डेनिका लॅब टेक सोल्यूशन्स एलएलपी'ची यशस्वी भरारी

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस सेलच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांनी स्थापन केलेल्या 'डेनिका लॅब टेक सोल्यूशन्स LLP' या तंत्रज्ञानाधारित स्टार्टअप कंपनीला भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयांतर्गत डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटरनल ट्रेडकडून अधिकृत स्टार्टअप म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच कंपनीने आंतरराष्ट्रीय मानकीकरण संस्थेच्या मानकांनुसार आवश्यक प्रमाणही मिळविले असून विद्यापीठाच्या नवोपक्रम आणि उद्योजकता क्षेत्रातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.



विद्यापीठाच्या IILसेलतर्फे आयोजित Hackathon: Bridging Science, Technology and Business for Start-up या उपक्रमांतर्गत प्राप्त झालेल्या स्टार्टअप प्रकल्प अनुदानाच्या माध्यमातून या कंपनीची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय मानांकिकरण संस्थेकडून (ISO) सुद्धा मानांकन प्राप्त झाले आहे. स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेसचे विद्यार्थी नीरज आर. कोयलवार व सुशील जी. जैस्वाल, तसेच स्कूल ऑफ कॉम्प्युटेशनल सायन्सेसच्या माजी विद्यार्थिनी डॉ. दीपा के. बोगले यांनी स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेसचे प्रा. डॉ. काशिनाथ ए. बोगले यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्तपणे ही कंपनी स्थापन केली आहे.

'डेनिका लॅब टेक सोल्यूशन्स LLP' ही कंपनी वायू, रासायनिक आणि प्रकाशीय संवेदन (Gas, Chemical and Optical Sensing) तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अत्याधुनिक नवकल्पना विकसित करीत आहे. औद्योगिक क्षेत्रातील गुंतागुंतीच्या समस्यांवर प्रभावी उपाय उपलब्ध करून देण्यासाठी बुद्धिमान सेन्सर प्रणालींचे डिझाइन, निर्मिती, एकत्रीकरण आणि प्रत्यक्ष वापर यामध्ये कंपनी विशेष कार्यरत आहे.

## जुन्या वादातून एकावर प्राणघातक हल्ला

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या सहयोगनगर परिसरातील मुख्य रस्त्यावर जुन्या वादातून एकावर सोमवार, दि. १५ जून रोजी रात्री प्राणघातक हल्ला करण्यात आला. त्या घटनेतील जखमीच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवार, दि. १५ जून रोजी रात्री १२ ते १२.२० वाजण्याच्या दरम्यान सहयोगनगर कॉर्नर ते राज कॉर्नर नांदेड येथे ही घटना घडली. युसूफखान चाँदखान पठाण (वय ५०, रा. सहयोग नगर, नांदेड) याने जुन्या वादातून मेहराजखान मेहबूबखान (वय ५१, रा. पिरबुऱ्हाणनगर, नांदेड) यांना ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या पायावर मारहाण करून गंभीर दुखापत केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी मेहराजखान मेहबूबखान यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लक्ष्मीकांत देशपांडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील मुक्रमाबादचे मूळ रहिवासी तथा हडको भागात वास्तव्यास असलेले लक्ष्मीकांत उर्फ अक्षय सुधीर देशपांडे (२८) यांचे मंगळवार, दि. १६ जून रोजी सकाळी ७ च्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सिडको येथील स्मशानभूमीत मंगळवारी दुपारी ४ च्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आजी, आजोबा, आई, वडील, बहीण, मेहुणा असा परिवार आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com